# FACE
## OFF



लेखक
संदीप शांताराम सुर्वे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संदीप शांताराम सुर्वे

लिखित

दोन अंकी नाटक

# फ़ेस ऑफ़

# फ़ेस ऑफ़

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

फ़ेस ऑफ़ (दोन अंकी नाटक)

संदीप शांताराम सुर्वे

पत्ता- मुंबई

फ़ोन : 9987311359 किंवा 9324466129

मेल : sandeepsurve25@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ७ डिसेंबर २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# पात्र परिचय

| | | |
|---|---|---|
| विशाल | : | वय २५ |
| कार्तिक | : | वय २५ |
| कविता | : | वय २२ |



# मनोगत

रसिक वाचकांचं प्रेमच इतकं मोठं असतं की लेखकाची लेखणी मग अविरत लेखन करीतच राहते. कधी विनोदी, कधी गुढलेखन, कधी रोमॅन्टिक तर कधी अतिशय हलकं फुलकं असं अनेक अंगी लिखाण करणं मला आवडतं. माझ्या प्रत्येक लिखाणाला रसिकांनी आजवर जी पसंती दिली त्यामुळेच ही नवनवीन लिहिण्याची स्फूर्ती येते.

चित्रपट, मालिका, गीते लिहिताना माझ्या लेखनाची सुरुवात ज्या एकांकिका व नाटकांनी केली त्या सर्व एकांकिका व ती सर्व नाटके माझ्यासाठी अनमोल आहेत. **“यातुनच घडलो.. यातूनच बिघडलो.. म्हणूनच मित्रांनो... तुम्ही भी घडा ना.. तुम्ही बि..घडाना.”**

नाटक लिहिताना व ती दिग्दर्शित करताना जे सुख मिळतं त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. **“माझं पहिलं प्रेम.. माझं वेड.. म्हणजे रंगभूमी...”** म्हणूनच हे नाट्यपुष्प आपणा नाट्यवेड्यांसाठी सादर.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9324466129
Sandeepsurve25@gmail.com

# ओळख




**संदीप शांताराम सुर्वे.**

लेखक – दिग्दर्शक - गीतकार.

नेहमी काहितरी वेगळं लिहावं हिच धडपड. शाळा कॉलेजपासून या क्षेत्राची चढलेली झिंग आजही तितकीच बेभान करते आणि फक्त लिहित जातो. मुंबईमधे जन्म झाला. शिक्षण व पोटापाण्याची धडपड इथेच केली. गेली काही वर्ष शूटींग निमित्ताने देशाच्या कानाकोपर्यात जावे लागते. पण मुंबईची ओढ पुन्हा इथेच घेऊन येते. मी कोकणातला.. पण महाराष्ट्रातील विविध मराठी उपभाषा आणि त्यासोबतच हिंदी, गुजराती, तेलुगू सारख्या अनेकविध भाषांमधे लिखाण करण्याचे भाग्य माझ्या नशिबी आले त्यासाठी देवाचे आभार. कोणतेही लिखाण करताना त्या कथेतील प्रत्येक पात्र मी जगतो. त्यांच्या श्वासाशी एकरुप होतो म्हणूनच मला त्या पात्राचा.. त्या कथेचा आनंद घेता येतो. रसिकांचे प्रेम हिच माझ्या लिखाणाची उर्जा. रसिकांनी दिलेली दाद मिळते आणि मग

अजून काहितरी लिहावेसे वाटते. आपल्या आसपास घडणार्या अनेक गमती जमती मी माझ्या लिखाणात सहजतेने वापरतो आणि प्रेक्षकांना ते आवडतेदेखील. असेच आपण भरभरुन प्रेम करावे आणि असेच मी भरभरुन लिहित राहावे.

रामचंद्र सडेकर, चंद्रशेखर फणसळकर, पु.ल. देशपांडे, सुरेश भट, राम लक्ष्मण, अशोक पत्की, संजय बेलोसे हिच या क्षेत्रातील माझी स्फुर्तीस्थाने.. माझी दैवतं. यांना मनापासून वाचलं..ऐकलं.. त्यांच्यावर प्रेम केलं म्हणूनच लेखणीशी माझं नातं जुळलं.

मी लिहिलेल्या अनेक नाटक, मालिका तसेच चित्रपटामधून अनेक जेष्ठ व श्रेष्ठ कलाकारांनी काम केले आहे. मी लिहिलेल्या गीतांना सुरेशजी वाडकर, सुदेशजी भोसले, साधना सरगम, वैशाली माडे, केतकी माटेगावकर, कौशिक देशपांडे, सिद्धांत सुदेश भोसले, महेश राव अश्या स्वरसम्राटांनी आपला सुमधुर आवाज दिला आहे. अजून बराच पल्ला बाकी आहे व तो गाठण्यासाठी आपली कौतुकाची थाप खूप महत्वाची.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9324466129
Sandeepsurve25@gmail.com

# <u>भाग पहिला</u>

## <u>प्रवेश पहिला</u>

(कार्तिक बेडवर टेकून बसलाय व कविता लिहीतोय. सिगरेटच्या धुराच्या वलयात नविन ओळी आठवत पानांवर उतरवतोय. तेव्हा कविता नुकतीच आंघोळ केलेल्या अवस्थेत डोक्याला टॉवेल गुंडाळत साडीमध्ये बाथरूममधून बाहेर येत कार्तिकजवळ येते.)

कविता : नविन कविता....... ? (कार्तिक किंचित हसत मानेने हो म्हणतो. कवितेचं टायटल वाचत) प्रियकर..... wow किती सुंदर नाव आहे कवितेचं. (कार्तिकच्या दंडाला मिठी मारत त्याच्या खांदयावर डोकं ठेवते.)
(लाडात कार्तिककडे पाहत) माझ्यासाठीच लिहीली आहेस ना ?

कार्तिक : (हसत) तुला काय वाटतं ? तुझ्यासाठी कि इतर... ?

कविता : (लटक्या रागात) असं काय करतोसं, सांग ना. माझ्यासाठीच ना ?
(कार्तिक हसतो) वाच ना लवकर कविता..... please...... वाच ना...... किती रे मस्के लावायचे तुला.

कार्तिक : कवितेचं नाव.........

कविता : प्रियकर... (हसते) म्हणजे तू .

कार्तिक : (हलकेच हसत)

असा अजाण मी प्रियकर
अबोध हृदयाचा स्वामी
प्रेमात पडलो तुझ्या
जिथे सुरू गुलामी
(ती लाजते)

प्रितीत तुझ्या रचली
मोहक काव्ये विपुल
पाहताक्षणीच जातील
नेत्र त्वरीत दिपून

अशी अगं तू माझी
प्राणप्रिये..... लेखणी
(तिला पेन दाखवतो. ती **खोटं** रागावते)
नाही तिन्ही जगी
तुझ्याविना देखणी

प्रित तुझ्यावर जडली
या दुःखी जीवनाची
अंत नाही ज्याला
न आशा संपण्याची........

(ती वळून कार्तिककडे पाहते. लटका राग.. कार्तिक हातातलं पॅड पेन बाजूला ठेऊन तिला जवळ घेत असतो. ती रूसते.)

कार्तिक : अच्छा......, म्हणजे एक माणूस रागावलं आहे तर आमच्यावर.

कविता : हो....

कार्तिक : म्हणजे आता यापुढे आमची एकही कविता ऐकणार नाही ?

कविता : नाही.

कार्तिक : आमच्याशी बोलणार नाही ?

कविता : नाही.

कार्तिक : म्हणजे आम्हाला आता लेखणीतून साकारलेली कविता आणि हया आसमंतातून उतरलेल्या सौंदर्यसम्राज्ञी कवितेपैकी कोणतीतरी एक कविता choice करावी लागणार.

कविता : होय...... (ती उठून बेडशेजारी हाताची घडी घालून उभी राहते.)

कार्तिक : कठिण आहे बाबा..........

(ती आश्चर्याने वळून त्याच्याकडे पाहते, रागावून पुन्हा तोंड फिरवते.)

एक कविता,
फक्त तुझ्यासाठीच
एक श्वास,
फक्त तुझ्यासाठीच
एक मन,
फक्त तुझ्यासाठीच

एक प्रेम,
फक्त तुझ्यासाठीच

प्रेमाचा गंध,
फक्त तुझ्यासाठीच

आणि तू,
फक्त माझ्यासाठीच

(तो तिला जवळ घेतो.)

कविता : काही मस्का लावायची गरज नाही. माझ्यापेक्षा लेखणीवर तुझं प्रेम जास्त आहे ना ? मग रहा लेखणी सोबतच. तिच्याशीच सुखाचा संसार कर.

कार्तिक : (हसत) अगं, तु माझ्या आयुष्यात येण्यापूर्वी तीच तर होती ना माझ्या आयुष्यात तेव्हा लेखणीवरच खूप प्रेम करायचो, कारण याच लेखणीतून माझ्या आवडीच्या कविता लिहिल्या गेल्या. पण खरं सांगू, जेव्हा पासून ही कविता माझ्या आयुष्यात आली आहे ना, तेव्हापासून लेखणीतून साकारणा-या कवितांना रंगच चढत नाही. हे कदाचित असं तर झालं नसेल ना, की हया कवितेशी लग्न केल्यामुळे लेखणीतली कविता कदाचित रागावली असेल माझ्यावर.

कविता : मग नव्हतं करायचं ना लग्न माझ्याशी, या लेखणीबरोबरच संसार करायचा होता. प्रित तुझ्यावर जडली या दुःखी जीवनाची म्हणे ...... (पुन्हा रागावत ) म्हणजे माझ्याशी लग्न केल्यामुळे तुझं जीवन दुःखी झालं तर ?

कार्तिक : अगदीच तसंच काही नाही. पण हे मात्र तुला मी ठामपणे सांगू शकतो कि बायको समोर नसताना एकातरी पुरुषानं छाती ठोकून सांगावं की, लग्न केल्यावर माझं जीवन सुखी झालं. गरीब बिच्चारे पुरुष

कविता : हो तर, काय म्हणे तर, गरीब बिच्चारे पुरुष... आणि मग या गरीब बिचा-या पुरुषांच्या बायका कोण ? त्यांना दुःखी करणा-या हडळी का ? बायको सोबत रस्त्यातून चालताना प्रत्येक पुरुषाचं लक्ष स्वतःच्या बायकोकडे कमी आणि रस्त्यावरून चालणा-या इतर बायकांकडे जास्त असतं. तेव्हा काय ते गरीब बिच्चारे पुरुष... आपली गरिबी आणि केविलपणा दाखवू पाहतात काय त्यांना ?

कार्तिक : असं काही नाही हा ! ते म्हणजे, ते काही इतर बायकांकडे त्या भावनेतून पाहत नसतात काय ?

कविता : मग, रक्षाबंधनाला बोलवायच्या भावनेतून पाहत असतात का ?

कार्तिक : *पुरूष* गरीब बिच्चारे असतात. गाढव बिच्चारे नसतात. ॲक्चयुली ते त्या इतर बायकाकडे पाहत विचार करीत असतात की, काय हाल करत असेल ही बया तिच्या नव–याचे ?

कविता : (त्याला चापट मारीत) म्हणे आम्ही बायका तुमचे हाल करतो? आम्ही दिवसभर किती मेहनत करतो घरात? म्हणूनच तुम्हा नव–याना चटपटीत खायला मिळतं? कितीही चांगलं बनविलं तरी नव–याच्या घशाखाली ते कधी उतरतच नाही. बायकांना दिवसभर घरी किती मेहनत करावी लागते. ते तुम्हाला काय कळणार?

कार्तिक : बायका मेहनत करतात? मग आम्ही काय कामाला जाउुन गोट्या खेळतो?

कविता : काय इतकं काम असतं रे डॉक्टरला? श्वास घ्या श्वास सोडा. इकडे बघा. तिकडे बघा, घ्या हया गोळ्या की झालं.

कार्तिक : अरे! घ्या हया गोळ्या काय? त्या काय पेपरमिंटच्या गोळ्या असतात काय? आणि काय गं! काय करता तुम्ही बायका, सांग जरा मला, कपडे धुवायला वॉशिंग मशीन, भांडी घासायला, साफसफाईला आणि जेवणात मदत करायला मोलकरीण असतेच ॲक्चुली आज काल बायकाच लक्ष आपल्या फॅमिलीकडे कमी आणि त्या टीव्ही सिरिअलकडे जास्त.. काय ते.... हं!..... माझीया प्रियाला प्रित कळेना कडेच जास्त लागलेल असते.

कविता : नाही तरी आमच्या प्रियाला कुठे कळते प्रित? दिवसभर हॉस्पिटलमध्ये आणि घरी आल्यावर

कविता लिहित बसायचं! ते बाजूचे जोशी बघ! कशी बायकोची गुलामी करतात. नाहीतर तू.....

कार्तिक : माझी पण खूप इच्छा आहे गं पण.......

कविता : (लाजत) मग कर ना तू गुलामी. पण कशाला मध्ये ?

कार्तिक : त्या जोशाच्या बायकोच्या अंगाला तुपाचा वास येत असतो गं. तुला माहित आहे ना ? मला मळमळत त्याच्याने.

कविता : तू कधी वास घ्यायला गेला होता तिच्या अंगाचा ? आणि काय रे! तुला जोशाच्या बायकोची गुलामी करायचीय ?

कार्तिक : तशी माझी काही हरकत नाही आहे त्याला पण काय आहे ना ? ऑलरेडी दोन दोन कवितामध्ये अडकलय हे मन. ये....... रागावलीस ? अगं थोडीशी गंमत करीत होतो तुझी तुझ्यशिवाय कधी कोणाचा विचार केला नाही मी, लग्नाआधी लेखणीतल्या कवितेमध्ये गुंतलो होतो आणि आता हया कवितेमध्ये. आता फक्त याच कवितेवर भरभरून प्रेम करायचय.

कविता : मग! माझी सवत रागवेल ना ?

कार्तिक : सवत ?

कविता : तुझी लेखणीतली कविता तिनेच तर तुला कवि बनविले ना ?

कार्तिक : अ..... हं.... लेखणीतून फक्त कविता उतरत होत्या पण मला कवि बनवत चाललेय ती ही कविता. तु माझ्या आयुष्यात आलीस आणि माझं आयुष्यच बदललं. लहानपणापासून अनाथ आश्रमातच वाढलो. संस्थांच्या मदतीने डॉक्टर झालो. आयुष्यभर फक्त प्रेमच शोधत होतो. तु आयुष्यात आलीस.. खूप तरसलो होतो प्रेम या शब्दासाठी

( ती त्याचा हात हातात घेते )

खरंच सांगतो, म्हणजे माझीही खूप इच्छा आहे गं! बायकोची गुलामी करायची पण! त्या जोशाची बायको तयार होईल का गं?

( ती त्याचा हात झटकून देते, रागावते तो हसतो आणि गाणं गुणगुणायला लागतो...... **मै कही कवि न बन** जाऊ तेरे प्यार में कविता..... )

## प्रवेश दुसरा

(कार्तिक दरवाजाची बेल वाजवू लागतो. सुंदर टापटीप व्यवस्थित घर. घराच्या उजव्या कोपऱ्यात एक टेबल व खुर्ची. उजव्या बाजूला पाठीमागे एका बाईची नग्न मुर्ती. मध्यभागी सोफा-टी पॉय, सोफ्याच्या उजव्या बाजूला अजून एका बाईची नग्न मुर्ती. विशाल उजव्या बाजूला असलेल्या नग्न मुर्तीकडे विस्फारलेल्या डोळयांनी पाहत असतो. धाडकन दरवाजा उघडतो.)

विशाल : (कार्तिक आत येतो. डोक्यावरचा घाम पुसतो. थरथरत असतो.)
कार्तिक बस . ते बघ जारमध्ये पाणी आहे. बाजूला ग्लास आहे. घे आणि पाणी पी. कार्तिक पाणी पितो. ग्लास ठेवतो. पुन्हा एकदा घाम पुसतो.) व्हॉट हॅपन्ड कार्तिक.. काय झालं ? एवढा घाबरलायस का ?

कार्तिक : एलफिन्स्टन पुलाजवळ..(पुन्हा एकदा पाणी पितो.)

विशाल : काय झालं एलफिन्स्टन पुलाजवळ ?

कार्तिक: एलफिन्स्टन पुलाजवळ ॲक्सिडेंट झालाय. अजब ॲक्सिडेंट. ट्रक आणि टॅक्सीची टक्कर झालेय. टॅक्सीतला माणूस बाहेर रस्त्यावर उडाला आणि त्याच्यावरून.. टॅंकर गेलाय. खूप चेंदामेंदा झालाय त्याचा, ओळखता पण येत नाही. पाहिलं त्याला आणि केल्या बकाबक उलटया मंडईच्या बसस्टॉपजवळ. लगेच माझ्याभोवती पण लोक गोळा झाले.

विशाल : *लोकांना फक्त तमाशाच पाहायचा असतो, ते तर वाटच पाहत असतात. कधी तमाशा पाहायला मिळतोय*. But thrill is one of the most important thing in our life. *आणि मित्रा तू डॉक्टर आहेस*. you are a doctor. *आणि तरीही ते दृश्य पाहून तू घाबरलास, उलट्या केल्यास*. What a joke.

कार्तिक : विशाल, *तो प्रकारच एवढा विचित्र होता की पाहणाऱ्यांच्या अंगावर शहारे आलेच पाहीजेत*. A Terrific moment in my life.

विशाल : *अजून बरेच प्रसंग तसेच तुझ्या आयुष्यात येणार आहेत. केव्हाही येतील. कदाचित आतासुध्दा.* (कार्तिक *दचकतो.*) Life is not complete without thrill.

कार्तिक : yes, *पण अशाच जर अजून एक दोन गोष्टी ह्या चार-पाच दिवसात घडल्या तर मला नाही वाटत मी सहावा दिवस पाहीन. त्यात मला ज्योतिषाने अगोदरच सांगितलय की माझा मृत्यू हार्ट ॲटॅकने होणार आहे आणि वर त्याने मला* पंचविसावं *वर्ष धोक्याचं सांगितलयं, आणि हे माझं* पंचविसावं *वर्ष आहे*.

विशाल : *तुझा* astrology *वर विश्वास आहे ?* (कार्तिक *गडबडतो.*) *माझा नाही. मी हे* astrology *वगैरे मानत नाही.* Don't worry. *तुला काही होणार नाही.* पाणी पितोस ?(कार्तिक नाही म्हणतो. कार्तिक *थोडा*

रिलॅक्स होतो.) पण केव्हातरी ज्योतिष्याच्या म्हणण्यानुसार होतं हा.(कार्तिक दचकतो. घाबरतो.) नाही. म्हणजे माझे शेजारी. मि .चिटणीस. अरे, शेजारच्या बंगल्यात रहायचे ते. त्यांना एका ज्योतिषाने सांगितलं होतं. तुमचा मृत्यू २३,२४,२५ डिसेंबर या तीन दिवसांपैकी केव्हातरी होईल. तुम्ही रात्री बरोबर बारा वाजता मरणार.

कार्तिक : मग..

विशाल : मग काय, तेवीसची रात्र जागून काढली. चोवीसची रात्र जागून काढली. पंचवीस शेवटचा दिवस.(कार्तिक टेन्समध्ये) रात्रीचे बाराचे ठोके वाजायला लागले आणि चिटणीसांच्या हृदयाचे ठोकेसुध्दा वाढायला लागले. बारा ठोके पडले तरी चिटणीस जिवंत.

कार्तिक : मग..( कार्तिक रिलॅक्स)

विशाल : मग काय, चिटणीसांना खूप आनंद झाला. मोठमोठयाने वेडयासारखे ओरडायला लागले. बारा वाजून गेले तरीही मी जिवंत आहे. ज्योतिषाचं भविष्य खोटं ठरलं. त्यांच्या बायकोलाही फार आनंद झाला. दोघेही आनंदात होते. चिटणीस जोरजोरात ओरडत होते. ज्योतिष्याला शिव्या देत होते, आणि अचानक चिटणीसांचं ओरडत बंद. (कार्तिक टेन्समध्ये) Heart Attack. Yes, दुसरा झटका. चिटणीसांची बायको रडवेली झाली. क्षणात सुख आणि क्षणात दु:ख.

आमच्या घड्याळाला अवदसा आठवली आणि बाराचा पहिला ठोका पडला. ठोका कानात आणि चिटणीसांचा प्राण बाहेर. बिच्चारे चिटणीस. बारा ठोकेसुध्दा ऐकू शकले नाहीत. चिटणीसांच्या बायकोने घड्याळाकडे पाहीलं. घड्याळात बारा दहा. चिटणीसांचं घड्याळ दहा मिनिटं पुढं होतं. मिसेस चिटणीसांना अश्रू आवरत नव्हते. त्यांच्या रडण्यामुळे तिथं गेलेले आम्ही लोक त्यांना सावरायचा प्रयत्न करत होतो. चिटणीसांना मी पुन्हा- पुन्हा तपासत होतो. पण व्यर्थ. After all I am a doctor. Not a god. मिसेस चिटणीस मोठ्या आशावादी नजरेनं अधून-मधून माझ्याकडे पाहत होत्या. मी sorry म्हटलं. पुन्हा एकदा रडण्याचा समारंभ सुरू. मला वाटलं, रडणं थांबवून त्या माझ्या sorry चीच वाट पाहत होत्या. (कार्तिक किंचित हसतो.) पण कार्तिक , एखादयाचा मृत्यु आला असेल ना. तर मात्र तो टळत नाही. (कार्तिक टेन्समध्ये ) वाईट वाटलं, ते एकाच गोष्टीचं. तिसऱ्या झटक्याचा अनुभव चिटणीसांना दुसऱ्या झटक्याने यायला दिलाच नाही. Selfish.

(कार्तिक प्रश्नार्थक नजरेने विशाल कडे पाहतो.)

विशाल: दुसरा झटका रे. क्षणात आला आणि चिटणीसांचं आयुष्य झटकून गेला. काळजी वाटतेय ती त्यांच्या मुलीची हिमानीची. हिमानी वय वर्षे अठरा. (कार्तिक रिलॅक्स .) नावातच सगळं आहे. हिमाप्रमाणे गोरी, भरीव अंगकाठी, रेखीव शरीर, स्तनाच्या

आकारावरूनच समजतं जपणूक जबरदस्त आहे. डोळे निळसर. समुद्रच पसरलेला वाटतो डोळयात. लालबुंद ओठ पाहीले की नकळत आपलाच ओठ आपल्याच दाताखाली येतो आणि काही क्षणातच लाल पाणी बाहेर.
पाय म्हणजे केळीचे खांब. तुळतुळीत. जवळ जाऊन शोधलास तरी केस सापडणार नाही. मागे तिची केस माझ्याकडेच होती ना. म्हणजे पायाला लचक भरली होती, तेव्हा बोलावलं होतं मला. तिच्या पायावरून हात फिरवताना वाटत होतं जणू काही रेशमाच्या गादीवरूनच हात फिरवतोय. इतके नाजूक पाय. कार्तिक यार फिगर म्हणजे काय हे पाहायचं असेल ना, तर तू तिला बघ. अगदी तंतोतंत ३६-२४-३६. उखळीचाच आकार वाटतो. तुला सांगतो कार्तिक तिला जो पाहील ना तो मधुबालाला सुध्दा विसरेल. सध्या ती बाहेरगावी गेलेय. काही दिवसांनी ती येईल. पण तोपर्यंत तू जिवंत असशील तर नक्कीच पाहशील.

कार्तिक : विशाल, काय झालंय तुला. तू मघापासून मला काहीतरी सेक्सी, गोड असं सांगतोयस आणि पुन्हा मृत्युची आठवण करून देतोयस.बघं, मला परत घाम आलाय. हे बघ, आधीच मी खूप नर्व्हस झालोय. त्यात तू मला अजून नर्व्हस करू नकोस. (घाम पुसतो.)

विशाल : अरे पण मृत्युच्या विषयाने..

कार्तिक : *(मध्येच तोडत)* stop it please. *मला तो विषय नकोय. मला सांग, तू मला फोन करून ताबडतोब कशाला बोलावलसं.*

विशाल : *होय. जरा महत्त्वाचं काम होतं. सिगरेट पिणार ?*

कार्तिक : *सिगरेट मरू दे रे. काम सांग.*

विशाल : *फ्रिजमध्ये* chilled beer *आहे.*

कार्तिक : क्या बात हैं ।

*( फ्रिजमधून बाटली काढतो. दोन ग्लास घेतो. )*

विशाल : *मला नकोय, तूच घे.*

कार्तिक : *का रे ?*

विशाल :*नाही मी नुकताच भरपूर जेवलोय.*

कार्तिक : *आणि मला म्हणालास जेवत बसू नकोस, लगेच ये. एनी वे, जेवलो नाही हे मात्र बरं झालं. म्हणजे म्हणूनच बियर प्यायला बसलो. ( बाटली उघडून स्वत:चा ग्लास भरतो. ) मला हा बियरवर येणारा फेस खूप आवडतो.*

विशाल : *हा फेस आपल्या लाइफसारखा आहे. हा फेस कधी उडतो कळतच नाही आणि आपलं जीवनसुध्दा.*

कार्तिक : विशाल *प्लीज.*

विशाल :हा कार्तिक , तू बियरबद्दल काय सांगत होतास ?

कार्तिक : मी बियरबद्दल.. हा. बियरचं काय आहे माहीतेय, ती ओतण्यापासून ते ती पोटात जाईपर्यंत भरपूर प्रिकॉशन्स घ्याव्या लागतात. ग्लासात बियर ओतताना ग्लास थोडं वाकडं करून मग बियर ओतायची. त्याने बियरवर फेस येत नाही. पण मी मात्र अशी बियर ओतत नाही, कारण मला फेस आवडतो. बियर पिताना नेहमी बियर थोडावेळ तोंडात घोळवायची. म्हणजे बियर पिताना एक वेगळीच मजा जाणवते. जेव्हा बियर आणि आपल्या तोंडातली लाळ मिक्स होते ना, तेव्हा बियरची रंगत अजून वाढते. (हसतो.) अरे मी बियरबद्दल तुला काय सांगतोय. you are my godfather . (दोघेही हसतात.)

कार्तिक : बरं आता सांग तू मला कशाला बोलावलसं ?

विशाल :बियर पिणं सुरू कर ना.

कार्तिक : अं..हं.. subject first.

विशाल : मी एक पुस्तक लिहायला घेतोय. problem असा आहे. माझ्या पुस्तकाचं टायटल incomplete आहे. म्हणजे बघ ना पुस्तकाचा विषय clear झाल्याशिवाय पुस्तक लिहीणार कसं.

कार्तिक : म्हणजे, तू तुझ्या पुस्तकाचं नाव ठरवलं नाहीस. अजून तू विषय फिक्स केला नाहीस.

विशाल : ते बघ. त्या टेबलावर पुस्तक ठेवलय.
(कार्तिक जाऊन टेबलावरून पुस्तक उचलतो.)

कार्तिक : मी आणि माझा.. ? अरे माझ्याच्या पुढे काय.. ?

विशाल : त्यासाठीच तर तुला बोलावलयं. तुझा अंदाज काय आहे. मी आणि माझा.. पुढे काय लिहलं पाहीजे, की ज्या सुंदर, पूर्ण टायटलवरून मग अतिशय जबरदस्त पुस्तक लिहीलं जाईल.

कार्तिक :पण मला कळत नाहीए, तू डॉक्टरीपेशाकडून लेखनाकडे का वळलास ?

विशाल : ती गंमत मी तुला नंतर सांगेन. अरे माझा जन्म कदाचित.. यस, जन्म. माझ्या जन्माची गंमत तुला माहीतेय ? अरे, अगोदरच म्हणजे सातव्या महीन्यातच जन्माला आलो. त्यामुळे फार अशक्त होतो. जन्माला आल्यापासून पहीली तीन वर्ष सिरीयस. पुढे जगेनच अशी आशा नाही. पण कदाचित डॉक्टरांमध्ये एकाची वाढ व्हावी अशी देवाची इच्छा असावी म्हणून वाचलो. माझे जन्मानंतरचे तीन वर्षातले फोटो पाहीलेस तर म्हणशील, एखादा आईबाप म्हणाला असता, असलं डोक्याला ताप देणारं पोरगं मेलेलंच बरं. आणि गंमतीचं सांगायचं तर माझा जन्म झाला आणि हॉस्पिटलच्या बाहेर एकाचा खून झाला. अंगाचा थरकाप उडवणारा.

*वडील सांगत होते म्हणून मला माहीतेय. माझी आई बिचारी साधी बाई. देवाधीकावर जबरदस्त विश्वास. देवावर विश्वास म्हणजे भुताखेतांवर आलाच. तिच्या डोक्यात काय भरलं माझ्यावर त्या माणसाच्या आत्म्याची सावली पडली असणार. मला घेऊन किती एक मांत्रिकांकडे गेली असेल, कुणास ठाऊक. मांत्रिकांना काय, पैसाच कमवायचाय. मग झपाटलं काय, आत्म्याची सावली काय, धमाल नुसती. तीन वर्षानंतर बरोबर सुधारत चाललो.नंतर जरा कळायला लागल्यानंतर विचार केला आणि ठरवलं, डॉक्टर व्हायचं. लहानपणापासूनच हुशार होतो, मेहनती होतो. त्यात ध्येय समोर दिसलं की त्यावरच तुटून पडावं हे पहील्यापासूनच माहीत. आणि झालो डॉक्टर. पण हे सर्व माझ्या जन्मामुळेच शक्य.*

कार्तिक*: मग तू तुझ्या पुस्तकाचं टायटल ''मी आणि माझा जन्म'' दे.*

विशाल *: असले झ्याटझूट टायटल सांगू नकोस. काहीतरी दमदार बघ.*
(कार्तिक *आश्चर्याने त्याच्याकडे पाहतो.) काय रे असा काय पाहतोयसं ?*

कार्तिक *: तुझ्या तोंडून झ्या..*

विशाल : *इ्याटझूट. .(हसतो.) अरे तो माझ्या बापाचा शब्द होता.*(कार्तिक *पुन्हा आश्चर्याने) बाप.. हा शब्द एकेरी वापरला म्हणून टेन्शन घेऊ नकोस. माझं माझ्या वडीलांबरोबर एकदम फ्रिली चालायचं. ते एखादी गोष्ट सांगत असले आणि माझं लक्ष नसलं तर ते म्हणायचे, बाप सांगतो आणि हा ऐकतो.* (कार्तिक्कडे *पाहून) हा च्या जागी काय शब्द असेल तुला माहीत असेलच.*

कार्तिक : ( हसून) भावना पोहचल्या. (कार्तिक बार काउंटर वरून सिगारेट घेवून सिगारेट लाईट करतो.)

विशाल :*असा माझा बाप. जबरदस्त माणूस. तो नसता तर माझं जगणच अशक्य होतं. ही गोष्ट वेगळी, तो नसता तर मी या जगात आलोच नसतो. ते वरून एकदम तो वर आलो ना. माझा बाप स्वत:च्या बापाला पण बापच म्हणायचा आणि मलाही सांगायचा की मला बाप म्हण. बाप हा शब्द कसा भरगच्च आणि दिमाखाचा वाटतो. स्वत: अशिक्षित, पण पोराला शिकवण्याची जबरदस्त इच्छा. शरीराने मजबूत. भोसले कुळातले वंशज म्हणून शोभायचे माझे वडील. आमच्या रांझ्याला सर्वजण म्हणायचे. बजरंगराव भोसले म्हणजे जणू काही संभाजी महाराज. काय दरारा होता त्यांचा गावात. एकदा आमच्या गावात चोरी झाली. चोरी कसली, एका माणसाचा बटवा हरवला. बटव्यात हजारएक रूपये होते. तेव्हाच्या काळात हजारएक रूपये म्हणजे भरपूर.*

*तो माणूस धावतपळत आमच्या वाड्यावर आला. वडीलांनी संध्याकाळी पंचायत बोलावली.*

*माझ्या वडीलांसमोर बोलायची कोणाची टाप नव्हती. सर्व गावकरी आले. आणि वडीलांनी सिंहगर्जना केली, ज्याने ही चोरी केली असेल, त्याने ताबडतोब बटवा परत करावा. आम्ही उदार मनाने त्याला माफी देऊ. पण जर का नंतर आम्ही त्याला पकडला. तर मात्र त्याला माफी मिळणार नाही. आपला शब्द म्हणजे क्षत्रियाचा शब्द आहे. प्राण जाईल, पण फिरायचा नाही. कोणी केली ही चोरी ? वडील गरजले, आणि लगेच ड़ोळयाचं पातं लवतं न लवतं तेवढयात गावचा पुजारी माझ्या वडीलांच्या पायावर पडला आणि धाय मोकलून रडायला लागला. म्हणाला एकवार माफी दयावी. माझ्या वडीलांना सर्वजण रावसाहेब म्हणायचे. पुजारी पुढे म्हणाला, गणोजीराव सकाळी दर्शनाला आले होते, तेव्हा त्यांचा बटवा पडला. बटवा दयायला जात होतो, पण बटव्याचं वजन जास्तं म्हणून बटवा उघडला, आणि आत एवढे पैसे पाहून मोहपाशात अडकलो.*

कार्तिक : *मग चांगलीच अदद्ल घडवली असेल त्या पुजाऱ्याला तुझ्या वडीलांनी.*

विशाल : *अंहं.., स्वत:चा दिलेला शब्द ते कधी मोडत नव्हते. त्यांनी त्याला अभय दिलं, मोठया मनानं*

कार्तिक : *अरे* विशाल, *विषय सापडला. तू असं का करत नाहीसं. तू तुझ्या वडीलांवरच पुस्तक लिहं. मी आणि माझा बाप.*

*नाहीतर बाप हा एकेरी शब्द तुम्हां दोघांचाही आवडता.* What a suitable Title.

विशाल : *चल रे. मला ना काहीतरी वेगळं लिहायचय. अगदी वेगळेपणा आला पाहीजे त्यात.* Some Abstract things. Yes & Some Sexy.

कार्तिक : Sexy?

विशाल : Yes Sexy. *माझ्या* Sex *बद्दल मी तुला काहीच सांगितलं नाही ना.*

कार्तिक : Sex *बद्दल*. What do you mean ?

विशाल : I mean, Those old days in my Life. *तेव्हा मी सात-आठ वर्षांचा असेन. घरच्यांबरोबर खूप फिरायचो. आमच्या घरीसुध्दा बरेचसे पाहुणे यायचे. असेच एकदा आमच्याकडे पाहुणे आले होते. एक जोडपं आणि त्यांची मुलगी. तरी तुला सांगतो, त्यावेळेस ती सतरा-अठरा वर्षांची असेल. रात्री जेवण वगैरे आटोपल्यावर सारेजण गप्पा मारत होते. मला झोप आली म्हणून मी झोपायच्या खोलीत जाऊन झोपलो. आम्ही सर्वजण एकत्रच झोपायचो. मध्यरात्री मला अचानक जाग आली. मला काय होतंय माझं मलाच कळंत नव्हतं. माझ्या बाजूला ती मुलगी झोपली होती, आणि ती माझ्या अंगाशी खेळंत होती. मला कुरवाळत होती. क्षणभर काय चाललंय हे मलाच कळत नव्हतं. पण काहीश्या सुखद वेदना मला*

जाणवत होत्या. तिने माझे छोटेसे हात स्वत:च्या स्तनांवर ठेवले आणि तो नाजुकसा स्पर्श मनात घर करून गेला. बस्स, तिथून म्हणजे वयाच्या आठव्या वर्षापासून जो सेक्स उफाळून आला तो कायमचाच. जवळ-जवळ पंधराएक दिवस होती ती आमच्याकडे. मग काय, रोजच्या रात्री जागायला लागल्या. नंतर लवकरच तिचं लग्न झालं.

पण त्या पंधरा दिवसात Sex चं बरचसं ज्ञान ती मला देऊन गेली. रात्री काय दिवसासुध्दा माळयावर आमचे खेळ चालायचे, डॉक्टर-डॉक्टर. सेक्स वाढत होता, पण त्याचा फरक अभ्यासावर पडला नाही हे नशीब. सेक्स आपल्याला ज्यावेळेस जाणवतो नां, ती मजाच वेगळी असते. सेक्स या शब्दानेच माणूस उत्तेजित होतो.

कार्तिक : मला पण त्रास व्हायला लागलाय. मी घरी जाऊ का ? मला पण..

विशाल : कार्तिक , तू माझ्या पुस्तकासाठी विषय सुचवायला आलायस ना.

कार्तिक : अरे, विषय काय सुचवायचा. मी आणि माझा सेक्स. लिहून टाक पुस्तक. तुझ्या सांगण्याने माझ्यासारख्या डॉक्टरवर एवढा फरक पडला, तर तू ते पुस्तक लिहीलंस तर काय होईल. एवढं मात्र नक्की, की तुझं पुस्तक साऱ्या जगात खळबळ उडवेल. कामसुत्राच्या पुस्तकासारखं.

(दोघेही हसतात टेलीफोनची बेळ वाजते.)

विशाल : उचल. तुझ्याच फोन आहे.

कार्तिक : माझा फोन ? विशाल हे तुझं घर आहे.

विशाल : अकरा वाजून गेलेयत. तुझ्या बायकोचाच असेल उचल.

कार्तिक : (रिसिव्हर उचलतो.) हॅलो,

कविता : हॅलो, कविता बोलतेय.

कार्तिक : हा, बोल मी कार्तिक बोलतोय. (विशालकडे पाहत त्याला सॅल्युट मारतो.)
काय झालं ?

कविता : काय झालं काय ? मोबाइल घरीच विसरून गेलास. आणि किती वाजले ? तू म्हणाला होतास लगेच येतो. किती वेळ झाला ?

कार्तिक : हा हा येतो, थोडया वेळात येतो.

कविता : कार्तिक, मी जेवायची थांबलेय तुझ्यासाठी.

कार्तिक : हो हो येतो मी लवकरच.

कविता : काही प्रॉब्लेम तर नाही आहे ना ?

कार्तिक : नाही काही नाही. काही प्रॉब्लेम वगैरे नाही आहे.

कविता : प्रॉब्लेम नाही. एं म्हणजे तू ड्रींक्स करायला नाही गेलायस ना तिथे ? हे बघ....

कार्तिक : कविता, मी बियर पित नाहीए.

कविता : मी कधी बियरचं नाव घेतलं? म्हणजे तू पक्का बियर प्यायला बसलायास.
(तो कपाळावर हात मारतो. विशाल हसतो.)

कार्तिक : तुला काय झालयं हसायला?

कविता : अरे मी कुठे हसतेयं ?

कार्तिक : तू नाही गं. हा विशाल हसतोय. बेट्या, दात दाखवणं बंद कर. तुझं लग्न झालं की कळेल तुला. फिर सब आटे दाल कर भाव पता चल जाएगा! एक दिवस तू पण उठशील आयुष्यातून.

कविता : एं काय म्हणालास ?

कार्तिक : मी, कुठे काय? मी काय म्हणालो?

कविता : मी ऐकलयं सगळं, म्हणजे तुला असं म्हणायचयं की माझ्याशी लग्न केल्यानंतर तू आयुष्यातून उठलास.

कार्तिक : अगं मी असं नाही म्हणालो.

कविता : मी ऐकलयं सगळं .

कार्तिक : I Mean to say…….. यार, शिट बियर प्यायच्या आधीच काहीही बरळायला लागलो.

कविता : म्हणजे तू बियर प्यायला बसलायंस ?

कार्तिक : नाही, म्हणजे हो. म्हणजे नाही. म्हणजे अजून मी काही बियर प्यायलेलो नाही. (विशाल हसतो)

कविता : म्हणजे आता पिणार आहेस तर ?

कार्तिक : हो, म्हणजे नाही. बियर नाही, ते आपलं हा पुस्तक पिणार आहे.

कविता : काय ?

कार्तिक : अगं म्हणजे, ते विशाल पुस्तक लिहितोय ना, ते डीस्कशन सुरू आहे. बियर वगैरे काहीच नाही आहे. वेडी, घरी थोडीच कोण बियरच्या बाटल्या आणून ठेवतो.

कविता : तू बियर प्यायला बसलायस ?हो ना ?

कार्तिक : हो, म्हणजे नाही. (रिसिव्हर ठेवतो आणि विशाल हसतो.)
यारं तुझ्या या लेखक व्हायच्या नाटकात मी फसलोय, आता कसं समजावू तिला.

विशाल : सांग ना. बसलो बियर प्यायला म्हणून.

कार्तिक : आजच Divorce Paper वर सही करू म्हणतोस. अरे आजच तिने मला...... (टेलीफोन वाजतो.)

विशाल : उचल...... (मोठ्याने हसतो.)

कार्तिक : माझा श्राप आहे तुला. तुझं पण लग्नानंतर असंच बियर पिणं बंद होऊ दे.

विशाल : मला श्राप नंतर दे आधी फोन उचल. नाहीतर मग..... (हसतो.)

कार्तिक : (रिसिव्हर उचलतो) हॅलो कविता.....

कविता : इतका वेळ लागतो फोन उचलायला. बियर गळ्यातच अडकली होती काय ?

कार्तिक : अजून बियर नाही प्यायलोय

कविता : अजून नाही प्यायलास. मग आतापर्यंत काय वासचं घेत होतास. जे काय उपदव्याप करायचेच ते कर. आणि आता सकाळीच ये. मी जेवून झोपतेय. आणि सकाळपर्यंत दरवाजा उघडणार नाहीए. मनसोक्त बियर पी. तुपाच्या वासानं मळमळतं म्हणे. बियरच्या वासाने तब्येत हरीभरी होत असेल ना ? आता रहा रा़त्रभर तिथेच गुड नाइट. (फोन ठेवते.)

कार्तिक : हॅलो, हॅलो अगं कविता ? (रिसिव्हर ठेवतो.) खाया ना पिया ग्लास फोडा बारा आना. (विशाल हसतो.)

कार्तिक : हसा, आता रात्रभर हसत बसा. I don’t mind आता रात्रभर इथेच आहे मी. आमचा दरवाजा आता सकाळपर्यंत उघडणार नाहीए. मी आता फ्रिज मधल्या सगळयाचं बियर रिकामी करून टाकणार. तुझ्या लेखक बनण्याची पार्टी. (दोघेही हसतात.)

पण कमाल आहे हा, आजकाल बरेचसे डॉक्टर लेखनाकडे वळलेयत. काय विशाल बरोबर बोलतोय ना मी? लेखकांना जास्त पैसा मिळतोय वाटतं डॉक्टरांपेक्षा. म्हणूनच बहुतेक डॉक्टर, डॉक्टरीपेशा विसरत चालले आहेत.

विशाल : अरे, डॉक्टरीपेशा म्हणजे आपली रोजीरोटी आहे आणि लेखन म्हणजे छंद. ही गोष्ट वेगळी आजकाल लेखकांना खूप मान मिळतोय. पण मी हे मान-सन्मानासाठी करत नाही हां. आयुष्यात काहीतरी छंद जोपासायलाच हवेत नाही का? तुला काय वाटतं? डॉक्टरीपेशा सोडला तर मी उपाशी मरेन? ह्या डॉक्टरीपेशामुळेच मला बऱ्याच काही गोष्टी मिळाल्या. जे जे अपेक्षित होतं ते ते मिळालं, सर्व काही. अजून काही गोष्टी मिळवायच्या बाकी आहेत. पण त्याही लवकरच मिळतील.

कार्तिक: विशाल, तुझं हे कोड्यात बोलणं माझ्यासाठी न उलगडणारं रहस्य आहे. गेली चार वर्षे तुझ्याबरोबर आहे,पण अजून तुला काही ओळखू शकलो नाही मी. किती आतल्या गाठीचा आहेस रे तू.

विशाल : होय. मी खूप आतल्या गाठीचा आहे. म्हणूनच समोरच्याच्या गाठी मी त्याच्या नकळतच सोडवतो.

कार्तिक: विशाल, काय म्हणू तुला यार,सांग ना. तू जे काय बडबडतोयस ना, ते माझ्या शेकडो फूट वरून जातं

आणि मग मला तो वीरगती मधला डायलॉग आठवतो. तू गलत युग का आदमी, गलत युग में पैदा हो गया है। (दोघेही हसतात.)

विशाल : मी अगदी बरोबर जन्माला आलोय. माझा जन्म अगदी Perfect युगात झालाय आणि मी मरणारदेखील Perfect युगात. पण तू केव्हा मरणार रे. नाही म्हणजे ज्योतिषाने तुला काहीतरी सांगितलंय म्हणून विचारतो. (कार्तिक अस्वस्थ ) कार्तिक यार, नर्व्हस होऊ नकोस हं. काय तू मरणाला एवढा घाबरतोस. मी बघ ना, मला यमदूत समोर उभा राहून म्हणाला ना की तुला वर न्यायला आलोय. तर मी म्हणेन. AIR INDIA ? म्हणजे नक्कीच चार-पाच तास उशिराने असणार. एक काम कर, एक एक बियर मारूया. मग जाऊया. पण तू काय म्हणशील त्याला ? म्हणजे, आता समज मी यमदूत आहे. आणि मी तूला विचारतो आहे. तुझी मरणवेळ जवळ आलेय. तुझा काळ आलाय. चल लवकर. मग तू काय उत्तर देशील.

कार्तिक : विशाल , तू परत त्या विषयाकडे वळलास. Please forget that subject, that fullish subject.

विशाल : Why? का ? तू डॉक्टर ना रे. साल्या, दुनियेला तू दिलासा देतोस. मृत्यु काय त्याच्या (देवाच्या) हातात आहे. डॉक्टरीपेशाचा टेंभा मिरवतोस की Apron घातलास की तुला कर्णाची कवचकुंडलं घातल्यासारखी वाटतात आणि तू बिनधास्त होतोस. आपल्याकडे बघ.

डॉक्टरीपेशातलं एक साचेबंद व्यक्तिमत्त्व. खूप फायदा झाला हा मला या पेशाचा. डॉक्टरीपेशा, सर्वांना हवाहवासा वाटणारा. तुला माहीतेय, बऱ्याच जणांना डॉक्टरीपेशा का आवडतो. त्याचं कारण एक गूढ आहे. एक ,एक रहस्य. पण मला उलघडलेलं. वयाच्या आठव्या वर्षीच स्त्रीचं शरीर चाचपायची सवय जडली, ती आजपर्यंत. पहील्यांदा लपून-छपून पण आता राजरोसपणे. Afterall डॉक्टर आहे ना मी. कोणाच्याही शरीराला कुठेही हात लावू शकतो. ऑपरेशनच्या वेळेस त्या उघड्या बायका पाहील्या की कसं भरून येतं. पाय थरथरायला लागतात. त्यांच्या त्या नग्न देहावरून हात फिरवताना स्वर्ग सुखाची प्राप्ती होते मला. नाजूक लुसलुशीत कोवळी कातडी. काही जणींची बर्फासारखी गोरी तर काहींची लाल. स्वत:ची वासना तृप्त करायचा हा एक अतिशय साधा आणि सोपा मार्ग. खूप स्त्रिया भोगल्या पण अजून माझी इच्छा काही तृप्त झालेली नाही. रोज नवनवीन शरीर. रोज नवीन कपडे घालायला लोकांना जशी मजा वाटते ना. त्यापेक्षा कितीतरी अधिक गंमत वाटते मला त्यांच्या शरीराशी खेळायला. त्या साल्यांना माहीत पण नसतं की आपल्याला बेशुध्द करून कोणीतरी आपल्या शरीराशी खेळतयं. मेलेल्या प्रेताप्रमाणे पडलेल्या असतात त्या. आणि मी माझ्या अतृप्त इच्छा तृप्त करून घेत असतो. त्रास सुरू झाल्यावर हलकेच कहण्याशिवाय दुसऱ्या कुठल्याही रिॲक्शन्स त्यांच्या चेहऱ्यावर नसतात. पण काही म्हणं यार.. जी मजा बाईमध्ये आहे ना ती मुलींमध्ये नाही.

कार्तिक : *म्हणजे तू..*

विशाल : *Yes, ऑपरेशन थियटरची प्रत्येक स्त्री मी भोगतो. हे हॉस्पिटल माझं आहे. इथला मी सार्वभौम राजा आहे. मी माझ्या मनाप्रमाणे वागेन. मला कोणीही अडवू शकत नाही. आज काय नाही माझ्याकडे. सर्व आहे सर्व. पैसा,गाडी,बंगला,रोज-रोज नवीन शरीर. तू का एकाच शरीरात गुरफटून राहीलायसं माहीत नाही.बघ माझ्याकडे, स्वच्छंदी फुलपाखरू. प्रत्येक फुलातलं थोडं थोडं मध चाखायचं म्हणजे आयुष्याला एक रंगत येते.*

(टेलीफोनची बेळ वाजते. कार्तिक रिसिव्हर उचलतो.)

कार्तिक : हॅलो.

कविता : कार्तिक

कार्तिक : हा कविता, बोल.

कविता : कार्तिक तुझा आवाज. एं काय झालं ?

कार्तिक : नाही काही नाही. तू जेवलीस ?

कविता : नाही अजून.

कार्तिक : तू जेवून घे. मी सकाळीच येईन. थोडं काम आहे.

कविता : कार्तिक, काही प्रॉब्लेम झालाय का? मी येऊ का तिथे.

कार्तिक : नाही नको. मी आहे. आणि तसा काही मोठा प्रॉब्लेम वगैरे काही नाही आहे. तू जेव आणि झोप. माझी वाट पाहू नकोस. मी सकाळीच येईन. चल बाय.

कविता : अरे पण.... ?

कार्तिक : चल ठेवतो मी फोन. थोडा कामात आहे मी. सकाळी बोलतो तुझ्याशी.
(रिसिव्हर ठेवतो)

कार्तिक: विशाल, *तू जो विचार करतोयस तो विचार तू करणं स्वाभाविकच आहे. पण* विशाल, *माझं एक ऐक. तू लग्न कर. मग तुला आयुष्य म्हणजे काय ते कळेल. हॉस्पिटलमधून थकून आल्यावर बायको जो चहा प्रेमाच्या दोन गोड शब्दांनी पुढे करते ना. त्याची रंगत काही औरच असते. टेन्शनमध्ये आल्यावर ती जेव्हा प्रेमाने आपली विचारपूस करते ना तेव्हा जग जिंकल्याचं समाधान* मिळतं. *भूक नाही म्हटल्यावर लाडात स्वत:च्या हाताने घास भरवते ना, तेव्हा तिच्या हाताचा गोडवा जणूकाही त्या अन्नात उतरलेला असतो. आणि त्यामुळे तो घास पंचपक्वांनापेक्षा सरस वाटतो. रात्री डोक्यात आबोलीचा गजरा माळून रात्र स्वर्गसुखात घालवते ती अवस्था. कधीतरी प्रेतांशी खेळणं सोडून एखादया जिवंत स्त्रीचा उपभोग घे. आपल्या लग्नाच्या बायकोबरोबर जागणाऱ्या रात्री काही औरच असतात.*

*तुझ्या नशीबाने जर तुला चांगली बायको मिळाली तर तुझ्या डोक्यात जे कुरूक्षेत्र माजलं आहे ना ते नष्ट होईल. आणि एक कर, तुझं पुस्तक पूर्ण होईल. तुझ्या पेशाबद्दलच लिही. मनात जे काही आहे ना ते उतरव पुस्तकात. मित्रा, मनातली गोष्ट सांगितली तरच मन हलक होतं. आणि तुझ्या डोक्यात हे जे काही विचित्र आहे ना ते काढून टाक. एखादी सुशिक्षित,सुसंस्कृत मुलगी बघून लग्न कर. मात्र तुझं हे पुस्तक पूर्ण कर आणि खमंग टायटल देऊन टाक. मी आणि माझा डॉक्टरीपेशा.*

(विशाल *हसतो.*) विशाल *असा वेडयासारखा का हसतोस. काय झालं तुला.*

विशाल : *मला काय झालंय.* Yes, *मला काहीतरी झालंय. आणि तू ते ऐकलस ना. तर तुझ्या पायाखालची जमीन सरकेल. मी माझ्या पुस्तकाचं टायटल ठरवलंय.* ***मी आणि माझा मृत्यु.***

कार्तिक : *हे काय टायटल आहे. मला सांग यामध्ये तू मृत्युविषयी लिहीणार ना. मग तू भविष्यकाळामध्ये पुस्तक लिहीणार की काय ?*

विशाल : *वेडा आहेस. मी पुस्तक भूतकाळावर लिहीणार.*

कार्तिक : *अरे, भूतकाळात पुस्तक लिहायला अजून तू अजून मेलेला नाहीस.*

विशाल : *हे तूला कोणी सांगितलं.*

कार्तिक : म्हणजे ?

विशाल : मी एकशेएक टक्के मेलेला आहे.

कार्तिक : म्हणजे ?

विशाल : मुर्खासारखं म्हणजे म्हणजे करू नकोस. ऐक, तू आलास, तेव्हा घाबरला होतास आठवतं. हां, कारण तू एल्फिन्स्टन पुलाजवळचा अपघात बघून आला होतास. काय म्हणाला होतास तू. A Terrific moment in my life. Yes, This is another Terrific moment in your life. तर तो तू पाहीलेला अजब ॲक्सिडेंट तो मीच होतो. म्हणजे ज्याच्या अंगावरून टॅंकर गेला तो. तुला आठवत असेल तू मला बियर ओतणार होतास. तेव्हा मी म्हणालो, मी नुकताच भरपूर जेवलो आहे. मी एक शब्दही खोटं बोललो नाही हा. एल्फिन्स्टनवरून घरी यते होतो ना, तेव्हा वाटेत हाफकीनच्या गेटसमोर त्या तीन रस्त्यांच्या मध्यभागी आमच्यासाठी कुणीतरी मस्त जेवण आणून ठेवलं होतं. भरपेट जेवलो.

कार्तिक : तू हे असं विचित्र..

विशाल : (ओरडून) विचित्र नाही. मी जे काही बोलतोय, ते भानावर राहूनच बोलतोय. माझा मृत्यु झालाय. आता तुझ्यासमोर जो आहे ना, तो मी नसून माझा आत्मा आहे.

म्हणूनच पाहीलस ना, मी मघापासून कुठल्याही वस्तूला स्पर्श केलेला नाही. तू आलास, घाबरला होतास. मी तुला पाणी प्यायला सांगितलं, मी नाही दिलं. बियरसुध्दा तुलाच घ्यायला लावली. एवढंच काय, आठवत असेल तर आठवं. माझं पुस्तकसुध्दा तूच उचललंस. टेलिफोनचा रिसिव्हर ही तुच उचललास म्हणजे एकूण काय, तर मी कुठल्याही वस्तूला स्पर्श केलेला नाही. अरे मी कुठल्याही वस्तूला स्पर्शच करू शकत नाही. कार्तिक तुला फार घाम आलाय. तो टॉवेल घे आणि घाम पूस. मी टॉवेल उचलू शकत नाही ना. (कार्तिक टॉवेलने घाम पुसून टॉवेल त्या नग्न स्त्रीच्या मुर्तीला पाहत त्या मुर्तीवर टाकतो.)

कार्तिक : तू हे खरं..

विशाल : विश्वास नाही बसत.

कार्तिक : तू मला का बोलावलंस.

विशाल : मूर्खा. बहीरा आहेस तू. मी काय म्हणालो, मी कोणत्याही वस्तूला स्पर्शच करू शकत नाही. ते पेन आणि ती डायरी घे. आणि लिहायला बस, वेळ घालवू नकोस. मला उशीर होतोय. आमची वेळ संपत आलेय, पहाट होतेय. चल लवकर (कार्तिक सोफावर बसतो.)

डायरी आणि पेन कोण माझा बाप घेणार ? (कार्तिक पेन आणि डायरी घेतो.)

लिही. मी आणि माझा मृत्यु. (कार्तिक लिहीतो.)
कार्तिक, मला एक नविन कल्पना सुचलेय. हे पुस्तक तू लिहीतोयस ना, मग आपण तूझ्या मृत्युबददल लिहूया ?

कार्तिक : म्हणजे काय म्हणायचय तुला ?

विशाल : मला तेच म्हणायचय जे तू समजतोयस कार्तिक तू पण मर. बघ ना. मृत्युनंतरची गंमतच काही और असते. कसं हलकं हलकं वाटतं. तूलापण हलकं वाटेल.

कार्तिक : म्हणजे तू मला मारणार ? प्लीज. विशाल, मी तुझा जवळचा मित्र आहे. तू मला मारू शकत नाहीस. मला एक बायको आहे रे. (रडतो.) आजच तिने मला एक आनंदाची बातमी सांगितलेय. मी बाप होणार आहे. आज संध्याकाळी जेव्हा तिने मला हे सांगितलं तेव्हा मी किती आनंदी होतो. प्लीज. मला माझ्या बायकोसाठी, तिच्या पोटात वाढणाऱ्या माझ्या मुलासाठी जिवंत ठेव. त्यांना माझ्याशिवाय दुसरा कुणाचाही आधार नाही.

विशाल : मलाही तुझ्याशिवाय दुसरा कुणाचाही आधार नाही. चल मरायला तयार हो. मी माझ्या हया हातांनी तुझा गळा दाबणार आणि तुला ठार करणार.

कार्तिक : तू मला मारू शकत नाहीस. कारण तूच तर म्हणालास, की तू कुठल्याही वस्तूला स्पर्श करू शकत नाही. मग तू माझा गळा कसा दाबणार.

विशाल : मूर्खा, मी भूत आहे. आणि कोणाला मारायचं असेल तर आम्ही दुरूनच त्याच्यावर आमचं प्रभुत्व गाजवतो. चल वेळ घालवू नकोस. मरायला तयार हो. आणि पळायचा वगैरे प्रयत्न करू नकोस. तुझे पाय जागचे हलणारदेखील नाहीत. खोटं वाटतय, तर बघ पाय उचलतात काय ते.(कार्तिक प्रयत्न करतो. पण तो फार घाबरलाय.त्याचे पाय उचलत नाही.) आता मी इथे बसून तुला मारणार. बघ तुझं डोकं सुन्नं झालंय. झालंय ना. (कार्तिक मान हलवतो.) तुझे हातपाय लटपटतायत. लटपटतायत ना ? (कार्तिक हा म्हणून ओरडतो.)

आता माझा हात तुझ्या गळयापाशी येतोय. माझा हात तुझ्या गळयाजवळ आलाय. तुला असं वाटतयं, जणूकाही काळसर्पाने तुझ्या गळयाला वेटोळं घातलंय.

कार्तिक : विशाल, प्लीज मला सोड. मला त्रास होतोय. विशाल.. (कार्तिक ओरडतो. आणि लगेच त्याला हार्ट ॲटॅक येतो. तो खाली कोसळतो. विशाल त्याच्या जवळ येतो. नाकासमोर हात नेऊन श्वास चालू आहे का पाहतो. नंतर रिलॅक्स आणि प्रसन्न चेहऱ्याने त्याचा हात पकडून हाताची नाडी तपासतो आणि ओरडतो.)

विशाल : Yes, I got it. मी जिंकलो. कार्तिक तू हरलास .
( वेडयासारखा करायला लागतो.)
कसा काय डाव साधला. मला शहाणपण शिकवतोय. म्हणे लग्न कर, सुखी होशील. अरे मूर्खा, फुलपाखरं स्वच्छंदी असतात. साधी गोष्टं विसरलास. साला,

माझ्याकडे जीवदान मागत होता. म्हणे मला एक बायको आहे. अरे असू दे ना तुला बायको. तू माझा जवळचा मित्र होतास. तू नसलास म्हणून काय झालं, मी आहे ना. तुझी जबाबदारी मी माझ्या शिरावर घेईन. चहा, हाताचा गोडवा, आबोलीचा गजरा सारं लक्षात आहे माझ्या. तुझ्या स्वर्गसुखाच्या रात्री मी जागवेन. तू काळजी करू नकोस. देव तुझ्या आत्म्याला शांती देवो.
(विशाल जाऊन ती ग्लासातली बियर पितो. शिल्पाजवळ जाऊन शिल्पावरील टॉवेल खेचतो. त्या नग्न मुर्तीकडे पुन्हा विस्फारलेल्या डोळ्यांनी पाहू लागतो. टेलिफोनचा रीसीव्हर उचलून फोन नंबर डायल करतो.)

# मध्यांतर

# ***भाग दुसरा***

## प्रवेश तिसरा

(कविता पाठमोरी उभी आहे. विशाल व कविताच रोमान्स सुरु आहे.)

विशाल : *ये, अशी लाजतेस काय आता. हा बघ, तुझ्या स्वप्नातला राजकुमार तुझ्यासमोर उभा आहे.(लाजते.) हाय..हाय.. तुझ्या हया लाजण्यावरच फिदा झालो गं मी. ए, कविता इकडे बघ.(ती त्याच्याकडे पाहते.) तुझ्या या ओठांतलं मध चाखायचयं मला.( ती वळून समोर जात असते. तो तिचा हात पकडतो.) तुझ्या रेशमी हातांचा पुष्पहार माझ्या गळयाभोवतीच राहून तुझ्या अंगाचा मादक स्पर्श सतत माझ्या सभोवती दरवळत रहावा.( ती पुढे सोफ्यावर बसते.) तुझ्या हया गालावरच्या खळीमध्ये स्वत:ला शोधत फिरावसं वाटतयं. तुझ्या हया केसांमध्ये स्वत:ला अडकवून घ्यावसं वाटतयं. तुझ्या या श्वासांबरोबरच प्रत्येक क्षण जगावसं वाटतयं. अप्सरांनाही लाजवेल असं तुझं सौंदर्य डोळयात भरभरून साठवावसं वाटतयं.*

*कविता: पुरे झालं हं. माणसानं एखादयाची खोटी प्रशंसा करावी पण इतकी पण करू नये की एवादयाला ती खोटीच वाटावी.*

विशाल : ए, माझ्या प्रेयसीचा अपमान करतेयस तू. चंद्रही लाजेल, जेव्हा तुझं सौंदर्य पाहील. चांदणीलाही विसरून, तुलाच शोधत राहील.

कविता : कविराज, रात्र होत आलेय. आता मला घरी जायला हवं.

विशाल : हे पण तुझंच घर आहे. अजूनसुध्दा कार्तिकच्या आठवणीत जगतेयस की काय ?

कविता: विशाल, तू काय बोलतोयस तुला तरी कळतयं. तुझ्यासाठी मी कार्तिकचा माझ्या नवऱ्याचा विश्वासघात केला. त्याला जाऊन सहा दिवस झाले नाहीत. सगळयांच्या संशयाने भरलेल्या नजरा माझ्याभोवती फिरतायत. तरीसुध्दा मी तुला भेटायला आले आणि तू म्हणतोस.. की मी त्याच्या आठवणीत.. वा ? छान ? फक्त तुझ्यासाठी मी माझा सुखाचा संसार मोडला आणि..

विशाल : ए कविता, अगं मी तुझी मस्करी करीत होतो.

कविता: प्लीज, असली फालतू मस्करी करू नकोस. तू ह्या गोष्टीचा विचार केलास ? कार्तिक गायब झाल्याची तक्रार मी पोलिसात दिलेय. सतत घरी कुणी ना कुणी विचारपूस करायला येतं. तरीसुध्दा मी फक्त तुझ्यासाठी इथं येते आणि तरीही..

विशाल : ए जानू, सॉरी. अगं झाली चूक हया पामराकडून. तुझ्या हया गुलामाला फक्त एकदा माफ कर. प्लीज. प्लीज. ए अगं कितीवेळा प्लीज म्हणू. मला माहीतेय. तू माझ्यावर स्वत:पेक्षा जास्त प्रेम करतेस. अगं माझंतरी तुझ्याशिवाय दुसरं कोण आहे गं. मी असा एकलकोंडा एकटाच राहणारा आणि एकटाच जगणारा. जा सोडून मला. तुझ्यासमोर भरपूर आयुष्य पडलंय. माझ्यासारख्याबरोबर राहून काय सुख मिळणार तुला. अजून कोणत्या विषियावर मस्करी करावी. हे सुध्दा मला कळत नाही.

कविता: तुझ्या हयाच वागण्यानं भुरळ घातली मला. विशाल , तुझ्याबरोबर बोलण्यात कुणीही जिंकू शकत नाही हा.

विशाल : तू तर मला संपूर्णच जिंकलयस. कदाचित माझ्यासमोर फक्त तू सोडून इतर कुणीही जिंकू शकत नाही.

कविता: चल.. तू पण ना. (सोफ्यावर बसते.)

विशाल : अगं अगदी खरं बोलतोय मी. तू खरोखरच अजिंक्य आहेस. तुला कुणीही पाहीलं ना, तरी तो तुझ्याकडे नकळत ओढला जाईल. देवानं तुला जेव्हा बनवलं असेल ना. तेव्हा नक्कीच वर बँक हॉलिडे असणार. खूप विचार करून त्याने तुझं एक-एक अंग बनवलंय. ज्याने मला पूर्ण वेडं करून टाकलंय. कविता, तू जेव्हा माझ्या मिठीत येतेस ना, तेव्हा मी मलाच विसरून जातो.

कविता: चावटच आहेस बघ. सारखं आपलं तेच बोलणं.

विशाल : मी फक्त बोलत नाही हा. बोलण्याबरोबर अजून बरंच काही करतो. (ती सोफ्यावरून उठून सोफ्यामागे येते.)

कविता: तुझा चावटपणा दिवसेंदिवस वाढतच चाललाय हा.

विशाल : अरे यात चावटपणा कसला आलाय. आपल्या दोघांचं एकमेकांवर प्रेम आहे, आणि प्रेम म्हणजे तरी वेगळं काय असतं गं. LOVE. L, O, V, E means Loss Of Valuable Energy.

कविता: अच्छा, म्हणजे माझ्यावर प्रेम करताना तुझी Valuable Energy कमी होते तर. ठीक आहे, मी उदयापासून तुला भेटणारच नाही. म्हणजे तुझी Valuable Energy वाचेल.

विशाल : उदयापासून ना. ठीक आहे. म्हणजे आजतर माझ्यासाठीच आहे ना. (तिचा हात हातात घेतो.) खरं सांगू, तुझ्यावर जीव ओवाळून टाकला ना तरी तो कमीच. तू मला पूर्णपणे वेडा करून टाकलयस. चोवीस तास डोळयासमोर तूच दिसतेस. तू जवळ नसलीस की कशातच मन लागत नाही. कसं चुकल्याचुकल्यासारखं वाटतं. आणि जवळ असलीस ना की, मग फक्त तुला जवळ घ्यावसं वाटतं. तुलाही माझ्याबद्दल असच काहीतरी वाटतं की.. ?

कविता: विशाल , तुझा हा स्वभावच मला तुझ्याजवळ घेऊन येतो. लहानपणापासून त्याच त्याच जगण्याचा वीट आला होता मला. कार्तिकशी लग्न झालं, तोही त्याच साच्यातला. स्त्रीला मन नसतं का? तिलाही आकाशात उंच भरारी घ्यावीशी वाटते. तिलाही मनमोकळेपणाने जगावंसं वाटतं. तिलाही जिवनाचा आनंद उपभोगावासा वाटतो. पण आपला समाज, स्त्री जरा फॉरवर्ड वागली की लगेच खटकतं सगळयांना. पुरूष जर जिवनाचा आनंद उपभोगू शकतो. मग स्त्री का नाही. मला तू आवडलास, कारण खरं जगणं तूच जाणतोस. तू मला तुझ्याबरोबर खरं जीवन जगायला शिकवलंस. नाहीतर माझा नवरा मिळमिळीत नुसता.

(हवा सुटते, पडदे उडतात. वीज इफेक्ट)

(कार्तिकचा आतमा उभा राहतो.)

थंडगार. माझ्यासारखी स्त्री बाजूला असतानाही हा थंडच. वयात आल्यापासून ॲग्रेसीव्ह पुरूषाचं स्वप्नं पाहीलं मी. आणि म्हणूनच मला तू आवडायला लागलास. मन पेटून उठल्याशिवाय शरीरसुख मिळणारंच कसं.

विशाल : ए, मी आहे ना. (तिच्या हातावरून हात फिरवत असतो.) आपण दोघं अगदी तसंच जीवन जगू. अगदी तूला आवडतं तसं.

कविता: (डोळे बंद करते.) मला श्वासाची भाषा आवडते. अंगाला स्पर्श करून जाणारा श्वास संपूर्ण अंगावर कसा रोमांच उभे करतो.

(कार्तिक तिच्या गळयाजवळ चेहरा नेतो. ती डोळे उघडते. विशाल ला सोफ्यावर झोपलेला पाहून पटकन पुढे येते.) विशाल , विशाल मला काहीतरी जाणवलं आता. विशाल , मला मला.( विशाल उठून कविताजवळ जातो.)

विशाल : ए कविता, काय झालं. काय जाणवलं तुला. ए, घाबरलीस का एवढी ?

कविता: तोच श्वास. तोच त्याचा हलकासा स्पर्श. त्याचा त्या शरीराचा गंध जाणवला मला.

विशाल : काय बडबडतेयस तू.

कविता: मी बडबडत नाहीए. विशाल, खरंच मला असं वाटलं की कार्तिक माझ्याजवळ आला होता. माझ्या गळयाजवळ, गालाजवळ.

विशाल : चल, असं काहीतरी..

कविता: काहीतरी नाही विशाल . मी खरं तेच बोलतेय. मला जे जाणवलं ते स्वप्न नाही सत्य होतं.

विशाल : कविता हे बघ, ओके, ओके. तू इथं सोफ्यावर बस पाहू. थांब मी तुला पाणी देतो.

कार्तिक : (हवा सुटते, पडदे उडतात, खिडक्या वाजतात, वीज कडाडते.)

*कविता, माझा श्वास ओळखलास तू. पण मला नाही ओळखलस. मी मिळमिळीत वाटलो तुला.*

( विशाल *पाणी घेऊन येतो.* )

कार्तिक : *(कविता पाणी पिते.)* विशाल , *मी तुझा एकुलता एक मित्र होतो. तू माझी संपूर्ण जबाबदारीच शिरावर घेतलीस. अगदी बायकोसकट.*

विशाल : *आता कसं वाटतंय.*

*कविता :* Yes, I am ok. *चल, मी येते आता.*

विशाल : *वेड लागलंय काय तुला. या अशा अवस्थेत तुला मी एकटीला कसा सोडेन. तू थांब थोडा वेळ. थोडं रिलॅक्स वाटलं की मग जा.*

कार्तिक : *तू जवळ असलास की तिला लगेचच रिलॅक्स वाटतं. थोड्या वेळाची गरजच भासत नाही तिला. तिला मिळमिळीत नाही सगळं कसं ॲग्रेसिव्ह आवडतं.*

*कविता :* विशाल , *तू नक्की* कार्तिकला..

विशाल : तू ही पाहीलं होतंस ना त्याचं प्रेत. पुन्हा पाहायचय तुला. चल, तुला खात्री करून घ्यायची असेल तर पुन्हा गार्डन उकरून दाखवतो.

कविता: तसं नाही म्हणत मी, पण मला..

विशाल : ( सिगारेट पेटवतो .)तुझ्या डोक्यातून अजून कार्तिक पूर्णपणे गेलेला नाहीए. अजूनही तो तुझ्या अवतीभवतीच जाणवतोय तुला.

कार्तिक : लग्नाची बायको आहे ती माझी. साल्या, फक्त स्त्रीच्या शरीराशी खेळणारा रे तू. तुला काय माहीत प्रेम, श्वास, गंध वगैरे. हरामखोर असली तरी बायको आहे ना माझी.( तिच्या केसांवरून हात फिरवतो. )

कविता: विशाल, कुणीतरी माझ्या केसांवरून हात फिरवत होतं. त्या त्याचाच स्पर्श होता तो.

विशाल : स्टॉप इट, डॅमिट. तू खेळवतेयस मला. मी, मी कार्तिकला खेळवून खेळवून मारलं. आणि तू आता माझीच थेरपी माझ्यावरच वापरतेयस.

कार्तिक : ती नाही रे. तुम्ही मला खेळवलत ना. आता मी तुम्हांला खेळवतोय. उंदरा-मांजराचा खेळ. मांजर उंदराला खेळवून खेळवून मारते. अगदी तसंच मारलंत मला.

आता माझी पाळी वीज देते टाळी,
फुलव पिसारा नाच.

नाच रे मोरा आंब्याच्या वनात . . .
नाच रे मोरा. . . नाच.
तू मोर आणि ही तुझी तात्पुरती लांडोर.

कविता: विशाल , मी खेळवतेय तुला. मी ? अरे तुझ्यासाठी मी माझ्या नवऱ्याचा काटा काढला आणि..

कार्तिक : आता हाच काटा नरडयात अडकणार तुमच्या

विशाल : आय एम सॉरी, मी तुला चुकून.

कविता: चुकून ? तुझ्याकडून अशी अपेक्षा नव्हती मला. ज्याने मला भुरळ घातली तो आज माझ्याशी असाही वागू शकतो. सर्व पुरूष सारखेच.

विशाल : कविता, आय एम सॉरी. मला तुला दुखवायचं नव्हतं. तुला पाणी हवयं. (कविता मानेनं नाही म्हणते.) ए जानू, इकडे बघं. जा चेहऱ्यावर पाणी मारून ये. जरा फ्रेश वाटेल तुला. हा सुंदर चेहरा हसताना आणखी सुंदर दिसतो. असं म्हणतात, माणसाने हसतमुख राहीलं ना की त्याचं आयुष्य आणि सुंदरता वाढते.

कार्तिक : पण मी तुम्हांला हसतमुख राहायला देईन तेव्हा ना. आता आयुष्य आणि सुंदरता दोन्ही विसरा.

विशाल : आता आपण दोघांनी झालं गेलं ते विसरून जाऊ. ओके, चल लवकर तोंड धुवून ये.

कार्तिक: जा. जा ना. किती प्रेमानं सांगतोय ग तो. जा तोंड धुवून ये. आणि मग तेच तोंड काळं कर त्याच्याबरोबर.

कविता: मी आलेच. टॉवेल आहे ना बाथरूममध्ये.

विशाल : हो.

कार्तिक: हो आहे. हयाला वापरलंस आता टॉवेल पण वापरून बघ. कदाचित प्रेम, श्वास, गंध काहीतरी सापडेल तुला. (ती बाथरूममध्ये तोंड धुवायला जाते.)

विशाल : कविता, आजची रात्र तू इथेच राहा. आता खूप उशीर झालाय. इतक्या रात्री तुला कुणी घरी जाताना पाहीलं तर परत नको ते होईल.

कार्तिक: साल्या, सुधारणार नाहीस तू. तिला तरी काय फरक पडतोय इथं राहायला. आता माझी अडचण मध्ये नाहीए ना...(कविता तोंड पुसत येते.)
तोंडच धुवून आलीस. मला वाटलं, आंघोळच करून येशील. आजची रात्र इथेच राहाणार ना तू. आता अशाच रात्री जागवायच्यायत ना तुम्हांला.

कविता: काय करू इथं राहून ?

विशाल : आजची रात्र जागवूया आपण.

कार्तिक : आपण तिघांनीही जागवायचेय आजची रात्र. थोडा उंदरा-मांजराचा तुमचा आवडता खेळ खेळूया. (विशाल तिला जवळ ओढून घेतो.)

कविता: विशाल. ( ती डोळे बंद करून घेते. विशाल तिचा डावा हात हातात घेऊन कीस करतो कार्तिक तिच्या गळयाजवळ कीस करायला लागतो. विशाल उठून बाजूच्या टेबलजवळ जातो. तिथली मेणबत्ती पेटवतो व लाईट बंद करतो.)

विशाल : कविता.. (कविता डोळे उघडते. विशालला समोर पाहून घाबरते. धावत विशाल कडे जाते.)

कविता: विशाल तू इथं आहेस. मग माझ्या गळयाजवळ, पाठीवर कोण हात फिरवत होतं. कार्तिक? हा.. हा.. कार्तिकचाच स्पर्श होता तो. (विशाल तिला ढकलून देतो. जाऊन लाईट लावतो.)

विशाल : कार्तिक, कार्तिक, कार्तिक. कधी विसरणार तू कार्तिकला. मी तुला ॲग्रेसिव्ह वाटतो, आणि मी जवळ असताना तुला कार्तिकचा स्पर्श जाणवतो. मिळमिळीत होता ना तो.

कार्तिक : लग्नाच्या पहील्या रात्रीच बलात्कार केला असताना हिच्यावर तर मी ही ॲग्रेसिव्हच वाटलो असतो हिला.

कविता: मी खरं बोलतेय विशाल . कार्तिक इथंच कुठंतरी आहे. आपल्या आसपासच वावरतोय तो. मला त्याचं अस्तित्व जाणवतय.

कार्तिक : पाहीलंस. हयाला म्हणतात प्रेम. हिला मी जिवंत नसतानाही माझं अस्तित्व जाणवतय. माझं अस्तित्व जाणवल्यावर ती तुझं अस्तित्व विसरायला लागलेय.

विशाल : अस्तित्व. (हसतो.) अगं अस्तित्व तर जिवंत माणसाचं असतं. तुझ्या नवऱ्याला मी मारलंय. चलं, तुला मी आता त्याचं प्रेत उकरून काढूनच दाखवतो. (तिचा हात पकडून तिला ओढत दरवाजाकडे नेत असतो.)

कविता: विशाल , प्लीज. मला ओढू नकोस. मला त्रास होतोय विशाल. (विशाल तिला सोडतो. ती टेबलाजवळ येऊन उभी राहते. कार्तिक तिच्याजवळ जातो. विशाल सिगारेट पेटवतो.)

कार्तिक : त्याचा ॲग्रेसिव्हपणा आवडला नाही तुला. माझा मिळमिळीत स्पर्श आवडेल काय गं ? (ती डोळे बंद करून रडत असते. तिच्यामागे उभा राहून दोन्ही हात तिच्या हातावरून फिरवत वर आणतो.)

कविता: (ओरडते.) विशाल . (धावत विशाल जवळ येऊन त्याचा हात पकडते.)
विशाल , मी खरं बोलतेय विशाल. माझ्यावर विश्वास ठेव विशाल . कार्तिक इथंच कुठंतरी आहे. माझ्या अंगाला सारखा त्याचा स्पर्श जाणवतोय. तो इथंच आहे. तो सूड घ्यायला आलाय. तो तूला आणि मला मारणार. विशाल , प्लीज. आपण दोघं कुठंतरी जाऊ. चल लवकर.

विशाल : हं.. तुझ्या अंगाला स्पर्श करतोय. मग माझ्या अंगाला का स्पर्श करत नाही. आँ.. मला घाबरतो की काय तो. ओ सॉरी त्याचं भूत.

कविता: विशाल ही मस्करी करण्याची वेळ नाहीए. मी खरं बोलतेय. माझं ऐक.

कार्तिक: नाही ऐकणार गं तो तुझं. खूप आतल्या गाठीचा आहे तो. त्याला दुसऱ्यांच्या बायकांच्या गाठी सोडायला खूप आवडतात. आता तुमच्या दोघांच्या गाठी मी सोडवतो.
( कार्तिक विशाल जवळ जातो. **वीज इफेक्ट.** )
( विशाल कविताजवळ येऊन कार्तिकच्या आवाजात बोलू लागतो.)

विशाल : मैं कही कवी ना बन जाऊँ, तेरे प्यार में कविता..२

कविता: विशाल., कार्तिक चा आवाज. हे गाणं.. हे गाणं कार्तिक म्हणायचा माझ्यासाठी. विशाल , विशाल . तू असा काय पाहतोयस माझ्याकडे.

विशाल : कविता. अगं थोडा वेळ तरी विश्रांती दे विशालला. सारखं आपलं विशाला, विशाल. अगं हे शरीर जरी विशालचं असलं तरी मन माझं आहे गं, तुझ्या मिळमिळीत कार्तिकचं. (विशाल तिच्या दिशेने जात असतो. ती मागे-मागे जात असते. टेबलच्या बाजूच्या खुर्चीत बसते.) ए, खरं सांग ना मला, मी मिळमिळीत होतो काय? मिळमिळीत? तुला मी माझी बायको समजत होतो ना, म्हणून तू जवळ आल्यावर तुझे लचके तोडत नव्हतो. बायको आणि वेश्येतला फरक कळत होता गं मला. तू चेहऱ्याने आणि मनानं मला एकदम साधीच वाटत होतीस,म्हणून एकापेक्षा एक डॉक्टर मुलींना नकार देऊन मी तुझ्यासारख्या गरीबाच्या मुलीशी लग्न केलं. गरीबाच्या पोरीला दीडमण चरबी. कुठल्यातरी पेशंटच्या तोंडून ऐकलं होतं, आणि आता अनुभवलं.

कविता: म.. मला माफ कर कार्तिक.

विशाल : माफी कशाबद्दल. अरे मला आधी माहीत असत नां, की तू फुल नाही आग आहेस. तर मीही तुला दाखवला असता माझ्यातला ॲग्रेसिव्ह पुरूष. मीही तोडले असते तुझ्या सुंदर शरीराचे लचके. तुझ्या पाठीवरचा तीळ

चुंबण्याऐवजी चावून काढला असता. मग तुलाही मी ॲग्रेसिव्हच वाटलो असतो. तुला बायको समजलो आणि मी मिळमिळीत ठरलो.

कविता: मी चुकले. मी पुन्हा असं करणार नाही.

विशाल : चुकले. (हसतो.) काय म्हणालीस ? पुन्हा असं करणार नाही. करणार नाही म्हणजे मला परत मारणार होतीस की काय ? ए, मार ना मला. हे शरीर तर कार्तिकचं आहे आणि त्यावर कब्जा माझा आहे. ए कविता, पुन्हा एकदा प्रयत्न कर ना मला मारायचा. हे बघ, एकतर तू तरी मला मार नाहीतर मी तरी तुला मारतो. एक काम कर, तो कॅन्डल स्टॅन्ड उचल आणि मार मला. मार ना. लवकर मार मला नाहीतर मी तुला मारेन.(ती स्टॅन्ड उचलत आणि मारते. विशाल तिचा हात वरचेवर पकडतो. कॅन्डल स्टॅन्ड काढून घेतो.)

आता माझी पाळी, वीज देते टाळी...

फुलव पिसारा नाच

नाच रे मोरा आंब्याच्या वनात

नाच रे मोरा नाच.

दोन दोन मोर आहेत आता तुझ्यासारख्या लांडोरीसमोर. एकाचं शरीर आणि एकाचं मन. आम्ही दोघं मारू आता तुला. तुझ्या हया सुंदर चेहऱ्यावर छोटीसी जखम करू काय गं ? कपाळावर की गालावर ? एक काम करतो. तुझ्या ओठांवरच जखम करतो. हा स्टॅन्ड तुझ्या ओठांवरच मारतो. राहतील ते

तुझे बाकीचे तुझ्याच घशात. तुझ्या पांढऱ्याशुभ्र दातांबददल बोलतोय गं. पान खाणाऱ्यांच तोंड कसं लालेलाल होतं. तसंच तुझंही तोंड लाल होईल. रक्ताचा मुलामा. कधी चव घेतलेयस रक्ताची. त्याच्यामध्येही एक नशा असते वेगळीच. जशी तुला तुझ्या सौंदर्याबददल नशा आहे. की हे सौंदर्यच नष्ट करू. हा हे सौंदर्यच नष्ट करतो. (कविता विशालला ढकलते. विशाल पडतो. कविता दरवाजा उघडायला जाते. दरवाजा उघडत नाही.)

विशाल : कविता, काय झालं. कुठं चाललीस. (विशाल कविताजवळ जात असतो.)

कविता : प्लीज, मला मारू नकोस. प्लीज, कार्तिक मला माफ कर.

विशाल : कविता, मी विशाल आहे विशाल. इकडे बघ. कार्तिक दिसतोय तुला इथं कुठे. आतापर्यंत तुला त्याचा स्पर्श जाणवत होता आणि आता तुला माझ्यातही तोच दिसायला लागलाय.

कविता: विशाल तू खरंच विशाल आहेस. तूला आता काही मिनिटांपूर्वींच काहीच आठवत नाहीए.

विशाल : तुला काय सांगायचय ना ते स्पष्ट सांग.

कविता : विशाल , कार्तिक आला होता. तुझ्या शरीरातच होता तो. आणि तूझ्या तोंडूनच बोलत होता तो.

विशाल : शट अप...कविता.

कविता : विशाल , खरं बोलतेय मी. तू मला सांग तू सोफ्यामागे कसा पडलास. अरे त्याने तुझ्या शरीरात घुसून मला मारण्याचा प्रयत्न केला. मीच ढकललं तुला आणि तू सोफ्यामागे पडलास.

कार्तिक : सुंदर मुली मूर्ख असतात असं ऐकलं होतं. पण तू तर एकदम शहाणीच निघालीस.

कविता: हा विशाल , तो खरोखरच तुझ्या शरीरात होता. हा बघ, हा स्टॅन्ड इथं पडलाय. हाच स्टॅन्ड तू म्हणजे कार्तिक नं मला मारायला उचलला होता.

विशाल : ओ के. चल, तो स्टॅन्ड तिथं ठेव. चल आपण झोपू.

कविता: विशाल , एवढं सगळं घडतंय आणि तू एवढा नॉर्मल वागतोयस. तुला काहीच वाटत नाहीए.

विशाल : वाटतयं ना. गप्प जाऊन झोपावंसं वाटतयं. तुलाही असंच काहीतरी वाटत असेल ना तर चल.

कार्तिक : झोपायला चल म्हटल्यावर ती नाही कशी म्हणेल रे. आणि त्यात तुझ्यासारखा ॲग्रेसिव्ह पुरूष सोबत

असल्यावर.(विशाल तिच्या कमरेत हात टाकतो. तिला जवळ ओढतो.)

विशाल: कविता, तुझ्या पोटात वाढणारं मूल कसं आहे गं. खरं सांग ते मूल माझं आहे की विशालचं.

कविता: विशाल.. (विशाल हसतो.) कार्तिक.. ?

विशाल : ओळखलंस मला.

कविता: प्लीज..प्लीज.. मला मारू नकोस.(टेबलाला चिकटून खाली बसते. डोळे मिटून घेऊन रडायला लागते. कार्तिक तिच्याजवळ जातो.)

विशाल : ए कविता, अगं मी विशालच आहे. घाबरतेयस काय अशी. अगं मी तुझी मस्करी करत होतो.

कार्तिक : कलाकार समजत होतो रे मी तुला. तू तर नकलाकार निघालास. सेकंडहॅन्ड वस्तू वापरणारा फक्त नकलाकारच होऊ शकतो रे.

विशाल: कविता, अगं डोळे उघड. इकडे माझ्याकडे बघ. अगं मी खरंच विशाल बोलतोय. हे बघ, तुझ्या पोटात वाढणाऱ्या माझ्या मुलाची शप्पथं घेऊन सांगतोय.

कार्तिक: तुझं मूल.(तिच्याकडे जातो.) हरामीपणाचा कहरच केलास गं तू. माझ्याबरोबर झोपताना थकलेली

असायचीस. मीही तूला कधी त्रास दिला नाही गं. स्वत:च्या इच्छा मनातच मारल्या मी. तू दुखावली जाऊ नयेस म्हणून आणि तू. महिन्यातली एखादी रात्रही माझ्याबरोबर जड वाटायची तुला की, संपूर्ण महीनाच हयाच्याबरोबर घालवायचीस ?

कविता: विशाल , प्लीज अशी मस्करी करू नकोस. मला कळत नाहीए की तू माझ्यावर का विश्वास ठेवत नाहीस. विशाल , मी खरं बोलतेय रे.

कार्तिक: डोकं आपट त्याच्यासमोर. कदाचित डोक्यातून लाल रक्त बाहेर आलं की, तुझ्या गोष्टी खऱ्या वाटतील त्याला. पण तुझ्यासारख्या नीच बाईच्या शरीरात लाल रक्त असेल की काळंच असेल अगदी तुझ्या मनासारखं.

विशाल : सॉरी,अगं कसं बोलू तुला मी. म्हणजे मला हे पटतच नाही जे तू सारखं मला कार्तिक बद्दल सांगतोयस.

कविता: म्हणजे तुला काय म्हणायचयं. मी खोटं बोलतेय तुझ्याशी. विशाल , तू हेच ओळखलंस मला. तू हा विचारच कसा केलास, की मी तुझ्याशी खोटं बोलू शकते.

कार्तिक: मी ही ओळखलं नव्हतं गं तुला. मी ही कधी विचार केला नव्हता, की तू माझ्याशी खोटं बोलू शकतेस. खूप प्रेम करायचो ना तुझ्यावर.

विशाल : तू बसं, मी कोल्ड्रींक आणतो तुझ्यासाठी ? (विशाल फ्रिजमधून कोल्ड्रींक आणायला जातो. कविता सोफ्यामागे येऊन उभी राहते.)

कार्तिक : फक्त कोल्ड्रींक देणार तिला. की त्याच्यात आणखी काही मिसळणार आहेस. हं.. त्याची गरजच नसावी नाही.

कारण तुम्हां दोघांनाही तेचं हवंय. आणि त्यात तुम्ही दोघंही ॲग्रेसिव्हच.

(कोल्ड्रींकची मोठी बॉटल व दोन ग्लास घेऊन येतो. सोफ्यावर बसून दोन ग्लास समोरच्या सेंटर टेबलवर ठेवतो. आणि त्यात कोल्ड्रींकओतत असतो.)

विशाल : कोल्ड्रींकची बॉटल खोलली ना की लगेच सगळं ड्रींक पिऊन टाकायचं. हया मोठया बाटल्या काही कामाच्या नाहीत बघं. आपण थोडं थोडं करून यातलं कोल्ड्रींक घेतो. पण मग राहीलेलं ड्रिंक एकदम मिळमिळीत लागतं. (हसतो.) मिळमिळीत. तुझ्या नवऱ्यासारखं.(कार्तिक रागाने त्याचाकडे पाहतो. तीही हसत असते.. …**वीज इफेक्ट ..** तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलतात. (विशाल एक ग्लास उचलून थोड कोल्ड्रींक पितो.)

अं.. ठीक आहे. (स्वत:चा ग्लास तिथंच ठेवतो. व दुसरा ग्लास उठून कविताला देतो.)

अगं घे. मिळमिळीत नाही आहे, त्याच्यात अजूनही थोडा ॲग्रेसिव्हपणा आहे माझ्यासारखा. (कविता ड्रींक पिते.)

कविता: (कार्तिक च्या आवाजात) ॲग्रेसिव्ह आहेस तू .( विशाल दचकतो.)

विशाल : कविता, तुझा आवाज. हे बघ, मला घाबरवतेयस. मला माहीतेय, मी मघाशी कार्तिक ची नक्कल केली ना म्हणून आता तू पण. हे बघ, आता मस्करी पुरे झाली.

कविता: मस्करी.. मस्करी करतच मारलंस रे मला. पुस्तक लिहायला बोलावलं होतंस ना मला. तुला तूझ्या पुस्तकचं टायटलच सापडत नव्हतं. बायकांच्या नाडया बरोबरं सापडतात तुला. जेवलास की नाही आज. उपाशी पोटी झोपू नकोस. आणि उपाशी पोटी शरीराची भूक कशी भागवणार तू. तब्येतीला जप. खूप ॲग्रेसिव्ह आहेस ना तू. असा काय पाहतोयस. अरे मी तुझा एकुलता एक मित्र कार्तिक . शरीरावर जाऊ नकोस रे. हे शरीर कविताचं असलं म्हणून काय झालं. आपण दोघांनीही वापरलंय रे हे शरीर. मी अधिकृत आणि तू अनधिकृत. पण तिची मजाच. राहू ना शरीरात तिच्या. फक्त थोडा वेळ. नवऱ्याचा बायकोवर एवढा अधिकार तरी असावाच नाही का ? तुला काही त्रास तर नाही होत आहे ना. टेन्शन घेऊ नकोस. मी हिच्या शरीराला काहीच दुखापत करणार नाही. मला माहीतेय, खूप नाजूक आहे ही. पण हिच्याबददल तुलाच जास्त नॉलेज असेल नाही. माझ्या चेकबुकवर तुझ्याच जास्त सहया असायच्या. लोकांना त्या माझ्याच वाटत होत्या. हा बघ.(स्वत:च्या पोटावर हात

फिरवत) एक चेक वटलाय सुध्दा. कोल्ड्रींक मस्त होतं. तुझ्यासारखच ॲग्रेसिव्ह. बॉटलचं बूच लावलंयस ना व्यवस्थित नाहीतर मिळमिळीत होईल ते माझ्यासारखं. जास्त कोल्ड्रींक चांगलं नाही विशाल . जा जेवून घे. मी भरपूर जेवून आलोय. तुला आठवतंय तू मला भूतलोकातल्या एका खानावळीचा पत्ता दिला होतास. हा तेच, हाफकीनच्या गेटसमोरचं तीन रस्त्यावरचं जेवण. खरंच अगदी भरपेट जेवलोय. (ग्लास ठेवतो.)

विशाल : कार्तिक..मला..

कविता: मला.. मला माफ कर ? असंच बोलायचय ना तुला ? कशाबद्दल माफी मागतोयस. अरे माझ्या बायकोला तुझ्याबरोबर झोपायला लाज वाटली नाही. मग तुला का वाटावी लाज. तू तर पुरूष आहेस. सॉरी, ॲग्रेसिव्ह पुरूष. हात उचल आता. खेळ ना हिच्या शरीराशी. हात पकडतोस. अरे मी हिच्या शरीरात असलो ना तरी अजूनही तसंच नाजूक शरीर आहे हिचं. तोड ना हिच्या शरीराचे लचके. मलाही पाहू दे ना, तुमच्या दोघांचा ॲग्रेसिव्हपणा.

ए विशाल , मी होऊ थोडा वेळ ॲग्रेसिव्ह. मी तुझा गळा दाबून तुला मारू ? आता मी तुला स्पर्श करू शकतो हा, कविताच्या हाताने. नाहीतरी तुला हवाहवासा वाटणारा स्पर्श आहे रे हा. तिच्या हाताने मेल्यावर लगेच स्वर्गप्राप्ती होईल तुला. अप्सराच येतील तुला

न्यायला. पण जर तू नरकात गेलास तर ? तरी काय फरक पडतोय. तुझ्यामागोमाग कविता येईलच की, तुझ्यातला ॲग्रेसिव्ह पुरूष शोधत. चल मरायला तयार हो. गळयावरचा हात काढ. मिळमिळीत नाही आहेस रे तू. काढ गळयावरचा हात. बघ. मेल्यावर कसं हलकं हलकं वाटतं. चल आता तू मरायला तयार हो.( कविता त्याचा गळा दाबायला जाते. हा तिला ढकलतो. ती सोफ्यामागे पडते. सोफ्यामागून कविता व कार्तिक दोघंही उठून उभे राहतात.). विशाल जवळ जात . विशाल तू इतका भेदरलायस का ?

विशाल : कविता, तू कविताच आहेस ना.

कविता: विशाल तू हे.., मी खाली कशी पडली ? म्हणजे कार्तिक माझ्या शरीरात.. (विशाल होकारार्थी मान हलवतो.) काय ? काय, बोलत होता तो ?

कार्तिक : काय बोलणार गं मी. तू बोलायला जागाच कुठे ठेवलेयस.

विशाल : कविता, तू म्हणाली होतीस कार्तिक इथंच कुठेतरी आहे. त्याचा आत्मा भटकतोय. चलं, चलं आपण बाहेर जाऊ.

( दरवाजा उघडायला जातात. दरवाजा उघडत नाही.)

कार्तिक : नाही उघडत दरवाजा ? कसा उघडेल. Our game is Incomplete. या, या इकडे. मी कविता बोलू. त्याच्या तालावर याल. मला ना लहानपणापासूनच कविता आवडायची. म्हणूनच तुझं नाव कविता आहे, हे कळल्यावर लगेच पास केलं तुला लग्नासाठी. आणि मीच नापास झालो. या मी कविता बोलतो. या बाई या बकुळेच्या झाडाखाली फुले वेचूया. तुझं नाव बकुळाच हवं होतं. नाहीतरी सगळेच वेचतात ना तुझ्या सौंदर्याची फुलं. आता मी जिवंत नाही म्हटल्यावर अजून किती अग्रेसिव्ह पुरूष येतील तुझ्या आयुष्यात. पण मी तुला पूर्ण मिळमिळीतच करून टाकेन.
(तिच्या केसांवरून फुंकर मारतो.)

कविता: विशाल त्याने फुंकर मारली माझ्या केसांवर. विशाल प्लीज तू सांग ना त्याला काहीतरी.

कार्तिक : हा भडवा काय सांगणार गं मला. अगं तू घाबरतेस काय अशी. तू बायको आहेस ना माझी. मग वेडी, प्रेमाची फुंकर होती गं ती. श्वास पण होता तिच्याबरोबर. श्वासाची भाषा आवडते ना तुला. म्हणूनच श्वासासकट प्रेमाची फुंकर मारली. कसा वाटला गंध ? ॲग्रेसिव्ह की मिळमिळीत. हं.. माझ्यासाठी ॲग्रेसिव्ह आणि तूझ्यासाठी मिळमिळीत. ह्याच्या संपूर्ण आयुष्यावरच फुंकर मारणार आहे मी.

कविता: विशाल , विशाल तू काहीतरी बोल ना.

विशाल : काय बोलू ? मला तर काहीच सुचत नाहीए. दरवाजा पण लॉक झालाय. कार्तिक प्लीज, तू जर इथंच कुठेतरी असशील ना तर प्लीज आम्हांला माफ कर. आम्ही चुकलो. आम्ही तुझ्याबरोबर चुकीचं वागलो. प्लीज आम्हांला माफ कर.

कविता: हो आम्ही पाया पडतो, कार्तिक.

कार्तिक: आपण पण जोडयानंच पाया पडायचो गं सगळयांच्या. आठवतं तुला ? आपल्या लग्नात आपण सगळयांच्या पाया पडत होतो. सगळे म्हणत होते. किती सुंदर जोडा आहे. पण आता तुला जोडयानंच मारावंसं वाटतंय गं.

विशाल: कविता, घाबरू नकोस. मी, मी आहे ना तुझ्याबरोबर. हे बघं, काहीही होणार नाही. मला वाटतं. कदाचित सतत तोच तोच विचार करून आपल्या दोघांच्या डोक्यावर त्याचा सायकॉलॉजीकल इफेक्ट झाला असेल.(हसतो.)

मला नाही वाटत, असं काही असेल. तू बस ना. (सोफ्यावर दोघं बसतात.) कोल्ड्रींक पितेस. अं.. नं..नको, कोल्ड्रींक नको. (घाम पुसतो.) मी, मी एक सिगारेट पिऊ ? (

( सिगारेट पाकीटातून काढतो. माचिसची काढी पेटवत असतो, पण ती पेटत नसते. माचिस फेकतो.) डॅमिट.. जाऊ दे. नाही पित सिगारेट. तुला काय खायला हवंय. चलं किचंनमध्ये जाऊ. नको, दोघं एकत्र नको. तू

सोफ्याच्या त्या कॉर्नरला बस मी या कॉर्नरला बसतो. (घाम पुसतो.) सकाळ झाल्या- झाल्या तू घरी जा. आणि मला भेटायला येऊ नकोस. मी बाहेरगावी चाललोय थोडया दिवसांसाठी. तू मला फोन पण करू नकोस. म्हणजे मोबाईल बंद ठेवणार आहे ना मी.

कविता: विशाल..( ती त्याच्याजवळ यते असते.)

विशाल : तिथेच बस. लांब माझ्यापासून.

कविता: विशाल ,असा काय वागतोयस. तू थोडं कोल्ड्रींक पी,तूला बरं वाटेल.

विशाल : कोल्ड्रींक, कोल्ड्रींक नको. कोल्ड्रींक नको. ठेवं ती बॉटल खाली. ठेवं आणि जा तू निघून. तुझ्यामुळे मला फुकटचा त्रास.

कविता: माझ्यामुळे तुला फुकटचा त्रास ? आता माझ्यामुळे तूला त्रास पण व्हायला लागला ? ( सोफ्यामागे उभी राहते.)

कार्तिक: ॲग्रेसिव्ह पुरूष संपलाय गं त्याच्यातला. आता तोही त्या कोल्ड्रींक सारखाच मिळमिळीत झालाय. मी मघाशीच सांगितलं होतं, कोल्ड्रींकच्या बॉटलचं बूच घटट् लाव. बूचंच लावलं नव्हतं ना त्यानं. झाला सगळा कोल्ड्रींक मिळमिळीतच. जा आता घेऊन जा त्याला बेडरूममध्ये आणि जागव बघू त्याच्यातला ॲग्रेसिव्ह पुरूष. अगं थंडगार पडलाय तो. चिल्ड. मुंबईतून

डायरेक्ट हिमालयात पोचलाय तो.तुझ्यातली अॅग्रेसिव्ह स्त्री काय म्हणतेय ? अजूनही श्वासाची भाषा कळतेय की श्वासच बंद होत आलाय.

( कार्तिक *तिच्या* शरीरात जातो. .. वीज इफेक्ट )

कविता: ( कार्तिक च्या आवाजात ) विशाल , काय झालं रे ? इतका घाबरलायस का ? तुझ्यातला सर्जन सायकॉलॉजिस्ट तर नाही ना झाला. ( विशाल घाबरून बाजूच्या टेबलाला चिकटतो. ) अरे पळतोस कशाला ? अॅग्रेसिव्ह पुरूष आहेस ना तू. की षंढ झालायस आता. नपुंसक. अजून स्त्रिया भोगायची इच्छा बाकी आहे, की संपल्या तूझ्या साऱ्या इच्छा-आकांक्षा. नवरा मेलेल्याला सहा दिवस नाही झाले, पण अगदी नटून-थटून आलेय तूझ्याकडे. चल ऊठ, वेळ नको घालवूस. अग्रेसिव्ह हो. अरे ऊठ. अरे वेडया, असा वागलास तर तूला पण ती मिळमिळीतच म्हणेल. मांडी घालून बसलायस, तूला जेवायला वाढू. बघ ना. तुझ्यासमोर तर कविताचच शरीर आहे ना मगं, मी ताट आणि पाट आणू तुझ्यासाठी ? नाही जेवायचं तुला ? मग उपाशीच मरणार तू. उपाशी नको रे मरू. मग माणसाचा आत्मा तडफडत राहतो. बघ ना, मला उपाशीच मारलंस ना टीट फॉर टॅट. मी पण तूला आता उपाशीच मारतो. घाबरू नकोस. अगदी सावकाशपणे आवळतो तुझा गळा. थोडाच वेळ श्वास घुटमळेल तूझा. मी सायकॉलॉजिकल इफेक्ट नाही देणार हा. तूझा हार्ट फेल व्हायच्या आधी, मी तूझा श्वास फेल करणार. तयार हो. नरकात जायचय तुला. सुंदर,सुंदर कुसक्या

दाताच्या हडळी वाट पाहतायत ना तुझी.(त्याचा गळा दाबते.) कोंडतोय श्वास. संपतय प्रेम. येतोय गंध. की , समाचारच समाप्त होत चाललेयत सगळे. बोल,बोल...

(विशाल मरून पडतो. कविता उठते, त्याच्याकडे पाहते.)

समाचारच समाप्त.

नाच रे मोरा..

आंब्याच्या वनात

नाच रे मोरा नाच.

आता माझी पाळी, वीज देते टाळी...

फुलव पिसारा नाच

नाच रे मोरा..

आंब्याच्या वनात

नाच रे मोरा नाच.

( सोफ्यामागे येऊन पडते..)

कविता: विशाल.. विशाल.. कुठेयस तू विशाल .
(विशालला पाहते. धावते. त्याच्याजवळ जाते.)
विशाल ,ऊठ.
(त्याच्या नाकासमोर हात नेते. पटकन उठून मागे येते. सोफ्यावर बसते. घाम पुसते. कोल्ड्रींकच्या बॉटलकडे पाहते. बॉटल घेऊन तोंडाला लावते. )

कार्तिक: मिळमिळीत आहे गं ते. अरे बस झालं. आवडत नाही ना तुला मिळमिळीत. थांबतच नाहीस कमालच झाली.

*ॲग्रेसिव्हपणाची आवड संपली की मिळमिळीतपणा आवडायला लागलाय तूला.*

*( बॉटल ठेवते.* विशाल *कडे पाहते. घाम पुसते. दरवाजा उघडायला जाते. दरवाजा उघडत नाही.* कार्तिक *हसतो. )* **चेकमेट.......**

*(***''मैं कहीं कवी ना बन जाऊँ, तेरे प्यार में कविता.......''** गाणे गायला लागतो. *ती येऊन सोफ्यावर बसते. भेदरलेल्या अवस्थेत.मध्येच* विशाल *कडे पाहते.* कार्तिक *तिच्या केसांवरून हात फिरवत असतो. ती पुष्कळ घाबरलेली, थरथरत असते. )*

कार्तिक *: ए कविता, तूला मी एक कविता ऐकवू ? ऐकशील ? फक्त तुझ्यासाठीच..*

*जगावेगळी माझी प्रीत*
*विचित्रच तिची रीत,*
*भेसूर तिचे गीत*
*न संपणारे..*

*प्रीतीची स्वप्नं भव्य*
*जणू काही अग्निदिव्य,*
*स्वप्नं दुभंगणारी काव्य*
*न उमगणारी..*

*माझ्या प्रीतीच्या वाटा*
*म्हणजे दुखांचा साठा,*
*मीच त्यातला काटा*
*न बोचणारा..*

*प्रीतीचा मार्ग सुयोग्य*
*साऱ्यांनाच वाटतो योग्य,*
*मीच ठरलो अयोग्य*
*न जाणणारा..*

**( गाणं गुणगुणायला लागतो.)**

**मैं कहीं कवी ना बन जाऊँ, तेरे प्यार में कविता.......**

**( गाणं गाताना तिच्या जवळ जातो व तिच्या मांडीवर झोपतो.....)**

****समाप्त****

# अर्पणपत्रिका

साहित्यकारांना साहित्यप्रेमींपर्यंत पोहोचवित अनेक रसिकांची साहित्यभुक भागविणार्या निस्वार्थ वृत्तीने कार्य करणार्या

**‘ ई साहित्य प्रतिष्ठान’**

या प्रकाशन संस्थेस

सदर पुस्तक

समर्पित.

संदीप शांताराम सुर्वे.

मुंबई.